|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ११ सोमवार दि. ०७ मार्च २०२२ ते रविवार दि. १३ मार्च २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## दार उघडे ठेवणे त्यांना महागात पडले चोर घुसला घरात आणि हत्याकांड घडले

भंडारा/क्राईम रिपोर्टर

माणसाने बाहेर असो अथवा घरी नेहमी सावध राहायचे असते. कारण बेसावध राहिल्यास कधी काही होईल याचा नेम नाही. खास करून ग्रामीण भागात चोऱ्यांचे प्रमाण जास्त वाढलेले आहे. अशा स्थितीत रात्रीच्या वेळी जर घराचा दरवाज व्यवस्थित लावून घेतला नाही तर चोरांची भीती असते. चोर घरात घुसून चोरी तर करतातच, पण प्रतिकार केल्यास एखाद्याचा जीव घ्यायला सुद्धा मागे पुढे पाहत नाहीत. भंडारा जिल्ह्यातील कोष्टी गावात दार उघडे ठेऊन झोपणे एका जोडप्याला चांगलेच महागात पडले आणि घरात ...पान २ वर

## ग्रामीण भागातील प्रवाशांचे तुमच्यामुळे झालेय मरण कितीही बोंबला संपकऱ्यांनो होणार नाही विलिनीकरण

वसई/वरिष्ठ प्रतिनिधी


शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे आणि नामार्दासारखे कुठेही गुडघे टेकायचे याला सरकार म्हणत नाही, तर हतबल बांडगुळांचा एनजीओ म्हणतात. महाराष्ट्रात सध्या अशाच मानसिक आजारी लोकांचा एनजीओ सरकार म्हणून काम करीत आहे. मुख्यमंत्री शारीरिक व्याधीने आजारी आहेतस तर त्याचे मंत्रिमंडळातील साथीदार मानसिक आजाराने त्रस्त आहेत. त्यामुळे कोरोन गेला तरी महाराष्ट्र अजूनही रुग्णालयातच आहे. काय म्हणायचे काय या लोकांना ज्यांना जनतेचे हाल दिसत नाहीत, ज्यांच्यात न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची ताकत नाही त्यांना खरोखरच सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. गेल्या साडेतीन महिन्यांपासून एसटी कामगारांचा बेकायदेशीर संप सुरु आहे. औद्योगिक न्यायालयाने हा संप बेकायदेशीर ठरवला तरी सरकारने त्यांना पगार वाढ दिली. तरीही संपकरी कामावर यायला तयार नाहीत. काय तर म्हणे त्यांचे शासकीय सेवेत विलीनीकरण व्हायला हवे. विलीनीकरणाच्या मागणीवर चर्चा करण्यासाठी न्यायालयाच्या आदेशाने त्रिसदस्यीय समिती नेमली. तिचा अहवाल सुद्धा आला. त्यात विलीनीकरणाची मागणी नामंजूर करण्यात आली आहे. असे असताना परिवहन मंत्री एसटी कामगारांच्या पाया का पडत आहेत तेच समजत नाही. ज्या ९२ हजार एसटी कामगारांनी महाराष्ट्रातील ४ कोटी प्रवाशांना वेठीस धरले आहे त्यांच्या पाया पडायचे कि त्यांचे पाय तोडायचे याची जर सरकारला अक्कल नसेल तर त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकारच नाही.



मतांच्या लाचारीसाठी एसटी कामगारांबद्दल सहानुभूती दाखवणारे सरकार आणि विरोधी पक्ष यांनी एकदा ग्रामीण भागात फेरफटका मारून बघावे. ग्रामीण भागात एसटी हे प्रवासाचे एकमेव साधन आहे. पण गेल्या तीन महिन्यात एसटीवर अवलंबून असलेल्या चार कोटी प्रवाशांचे प्रचंड हाल सुरु आहेत. सध्या शाळा सुरु झाल्यात. पोराबाळांना पाच पाच मैल शाळेत चालत जावे लागतेय. पोरांनी रस्त्यात उभे राहून एखाद्या वाहनाला हात दाखवला तरी कोण त्यांना लिफ्ट देत नाही. त्यातच दहावी-बारावीच्या परीक्षा सुरु होणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर कसे जायचे. एसटी कर्मचाऱ्यांच्या पाया पडणारे परिवहन मंत्री आणि संपकऱ्यांचे तारणहार बनलेले विरोधी पक्षातील भाजपवाले यांचे डोळे फुटले आहेत का? त्यांना ग्रामीण जनतेचे हे हाल दिसत नाहीत का?

अरे प्रत्येक गोष्टीत राजकारण कसले करता. इथे लोकांचा जीव जायची पाळी आलीय. एसटीच्या संपामुळे ग्रामीण भागातील आजारी माणसाना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जाता येत नाही. त्यांच्यावर घरातच तडफडून मरण्याची पाळी आली आहे. ग्रामीण भागातील जे लोक शहरात कामाला होते त्यांना या एसटी संपामुळे कामावर जाता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपाशी मरण्याची पाळी आलेली आहे. या संपामुळे खाजगी वाहनचालक अक्षरशः ग्रामीण जनतेची लुटमार करीत आहेत. त्यांच्याबद्दल सरकार किंवा विरोधी पक्षाला काहीच कसे वाटत नाही. सरकार कायद्याने चालते. संविधानावर चालते असे सांगितले जाते. मग औद्योगिक न्यायालयाने हा संप बेकायदेशीर ठरवलेला असताना निर्णयाची अंमलबजावणी का केली जात नाही. माननीय न्यायालयाच्या आदेशानेच त्रिसदस्यीय समिती स्थापन झालीय आणि त्यांनी विलीनीकरणाची मागणी कशी अव्यवहार्य आहे हे आपल्या अहवालात म्हटले आहे. असे असताना परिवहन मंत्री संपकरी कामगारांचे निलंबन आणि बडतर्फीच्या नोटीसा मागे घेऊ असे का सांगत आहे. सरकार आणि चार कोटी प्रवाशांपेक्षा संपकरी मोठे आहेत का? या संपला कोणतेही कायदेशीर नेतृत्व नाही. सदावर्ते नावाचा एक मनोरुग्ण ...पान २ वर

## संशयाने प्रियकर अगदी वेडापिसा झाला प्रेयसीला मारून आत्महत्येचा प्रयत्न केला



यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

आजकालचे प्रेम हे अळवावरच्या पाण्याच्या थेंबासारखे असते. त्यामुळे प्रियकर प्रेयसीचा एकमेकांवर विश्वास नसतो. अशावेळी प्रेयसी दुसऱ्या कोणाशी बोलताना दिसली किंवा मोबाईलवर कोणाशी बोलताना दिसली कि प्रियकराच्या डोक्यात संशयाचा किडा वळवळू लागतो आणि त्यातून मग दोघांचे संबंध बिनस्तात. उमरसर मधील आस्था आणि तिचा प्रियकर शुभम या दोघांच्या बाबतीत तसेच झाले. शुभम तिच्यावर संशय घेऊ लागला आणि त्यातून दोघांची भांडणे होऊ लागली आणि एके दिवशी शुभमने आस्थाला भेटायला बोलावून तिला ठार मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र त्याला वेळीच उपचार मिळाल्याने तो वाचला या प्रकरणी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



अस्था सुरेश तुंबडे ही १८ वर्षीय तरूणी बी.कॉमच्या पहिल्या वर्षात शिकत होती. ती उमरसरातील गुरूमाऊली सोसायटीत आपल्या आई-वडिलासह राहयला असून ती घरची लहान मुलांची शिकवणी घेत होती. तिचा स्वभाव मनमोकळा असल्याने ती कुणाशी ही हसत खेळत बोलत असायची. तशी ती निडर आणि धाडसी ही होते. जीवनातील कोणत्याही आव्हानाचा सामना ती समर्थपणे करायची. तारूण्य सुलभ भावनेतून तिचे ही शुभम बकाला नावाच्या तरूणावर प्रेम बसले होते. ते दोघे ही भेटत होत, विचाराची देवाण घेवाण करीत होते. ते दोघे प्रेमात इतके आकंठ बुडाले होते की त्यांना स्वत:शिवाय दुसरे कुणीच दिसत नव्हते. तो तिला लोहारा येथील दाते महाविद्यालात सोडायला आणि आणायला ही जात होता. त्यामुळे त्या दोघांच्या प्रेम संबंधाची चर्चा ही कॉलेज परिसरात आणि त्याचे मित्र मैत्रीणीत होत होती. ते दोघे लवकरच लग्न करणार असल्याची हवा ही त्याचे मित्र मैत्रीणीत होवू लागली होती.

त्या दोघांचे मनापासून एकमेकांवर प्रेम असल्याने त्याचे समज गैरसमज असे काही नव्हते. दोघांना ही एकमेकांच्या कौटुंबिक परिस्थीतीची जाणीव होती. दोघे ही एकमेकाला समजावून घेत होते. असे असले तरी ही अलिकडच्या काही महिन्यात ...पान २ वर

## वयस्कर महिलेने गोड बोलून घात केला वासनेच्या खेळात तरुणाचा जीव गेला

नाशिक/क्राईम रिपोर्टर

लैंगिक विकृती हि माणसाला कुठल्याही थराला घेऊन जाते. क्रॉस एजचे आकर्षण हा सुद्धा त्यातलाच प्रकार आहे. त्यामुळे आपल्या पेक्षा लहान वयाच्या पुरुषाचे स्त्रीला किंवा आपल्या पेक्षा लहान वयाच्या मुलीचे पुरुषाला आकर्षण निर्माण होत असते आणि त्यातून अनेक गुन्हे घडत आहेत. नाशिकमध्ये एका महिलेने आपल्यापेक्षा २० वर्षांनी लहान असलेल्या मुलाशी संबंध जुळवले आणि त्याचे शोषण केले, पण जेंव्हा ती त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकू लागली, तेंव्हा त्या मुलावर आत्महत्या करण्याची पाळी आली. मात्र त्याच्या आत्महत्येला रस्ते अपघात दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण पोलिसांनी तो हाणून पडला आणि आरोपी महिलेला तिच्या साथीदारांसह अटक केली.

नाशिक शहरातील अडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक विचित्र घटना उघडकीस आली आहे. येथील एका महिलेनं आपल्या वयापेक्षा २० वर्षांनी लहान असणाऱ्या तरुणासोबत लग्न करण्यासाठी सर्व हद्द पार केली आहे. संबंधित तरुणानं आपल्याशीच लग्न करावं म्हणून आरोपी महिलेनं त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ केला आहे. आरोपी महिलेच्या छळाला कंटाळून अखेर संबंधित तरुणानं आरोपीच्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी एक महिलेसह दोन तरुणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास अडगाव ...पान २ वर

## मैत्रीतील गद्दारीमुळे मयुर चिडला फार पत्नीशी संबंध ठेवणाऱ्या मित्राला केले ठार



मयत निखिल

धुळे/क्राईम रिपोर्टर

आजकाल कुणीही कुणावर डोळे झाकून विश्वास ठेवू नये. कारण कोण कधी विश्वासघात करील याचा नेम नाही, जिथे रक्तातल्या नात्यातले लोक विश्वासघात करतात तिथे मित्रांचे काय? धुळ्यातील मयूर आणि निखील हे दोघे जिवलग मित्र होते. त्यामुळे निखिलचे मयूरच्या घरी जाणेयेणे होते. मात्र निखिलने मित्राशी गद्दारी केली आणि त्याच्या पत्नीला पटवले. त्यानंतर मयूरच्या पत्नीशी निखिलचे अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र याची कुणकुण मयूरला लागताच त्याने आपल्या दोन भावांच्या मदतीने निखिलचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.





धुळे शहरातील मयुर मच्छिंद्र शार्दूल आणि निखिल साहेबराव पाटील हे दोघे जिगरी दोस्त म्हणून परिचीत होते. दोघांचे एकमेकांच्या घरी जाणे येणे नित्याचे झाले होते. सुख दुखा:च्या प्रसंगी ते सोबत जात -येत होते. दोघा मित्रांच्या माध्यमातून त्यांचे कुटूंबीय देखील एकमेकांच्या जवळ आले होते. वहिणीच्या नात्याने मयुरच्या पत्नीची निखील सर्वासमक्ष चेष्टा मश्करी करत असे. त्यात कुणाला वावगे वाटत नव्हते. मयुर आणी निखीलची मैत्री घट्ट झाली होती. दोघांच्या मैत्रीचा प्रवास पुढे पुढे सरकत होता. मात्र सन २०२१ च्या अखेरीस त्यांच्या मैत्रीत मिठाचा खडा पडला. मयुरला एका अनोळखी इसमाचा फोन आला. तुझ्या पत्नीचे निखील सोबत अनैतिक संबंध आहेत, तु सावध हो. असा पलीकडून बोलणाऱ्याने मयुर यास बजावले. अनोळखी इसमाचा फोन आल्यापासून मयुरचे मानसिक स्वास्थ बिघडले. तो अस्वस्थ राहू लागला. निखीलकडे तो संशयी नजरेने बघू लागला. निखील मात्र नेहमीप्रमाणे सामान्य स्थितीत मयुरच्या घरी येत ...पान २ वर



जखमी दिपक

## जमिनीचा वाद त्याच्या प्राणावर बेतला कर्जदारानेच सावकाराचा जीव घेतला

हातकणंगले/क्राईम रिपोर्टर



मयत मुनाफ

व्याजाच्या पैशाचे व्यवहार जेंव्हा वेळेवर पूर्ण केले जात नाहीत, तेंव्हा त्यातून वाद निर्माण होतात आणि माणसे एकमेकांच्या जीवावर उठतात. साजणी गावातील नितीन कानोरे यांनी त्यांचा मित्र असलेल्या मुनीफ यांच्याकडून लाखभर रुपये व्याजाने घेतले होते. पण ते वेळेवर देता आले नाहीत म्हणून मुनिफने नितीनची जमीन तेवढ्याच पैशात ताब्यात घेतली. त्यामुळे नितीन भयंकर चिडला होता आणि यातूनच एकेदिवशी दोघांमध्ये वाद होऊन नितीनने मुनाफची हत्या केलीय.

बऱ्याच वेळेला शेतजमीनचा वाद हा वर्षानूवर्ष मिटत नसतो. तो चिघळतच असतो. हल्ली शेती करणे हे परवडत नसल्याने काही शेतकऱ्याची मुले ही शेती कडे न वळता नोकरी अथवा इतर व्यवसायाकडे वळत आहेत. तर बरेच जण शेती करता करताच घायतीला आल्याने कर्जबाजारी होऊन एक तर आपली शेती गहाण टाकतात किंवा त्याचेवर कर्ज काढतात. अशावेळी ते आर्थिक अडचणीत येत असल्याने ज्याच्याकडून त्यांनी पैसे उचल केलेली असते त्यालाच ते आपली शेती विकतात अशावेळी समोरच्याची आर्थिक अडचण बघून विकत घेणार ती शेती अल्प किंमतीत ती शेती विकत घेत असतो. अशावेळी विकत ...पान २ वर

## मोबाईलवरील गेम खेळताना वेळकाळ कुठली पब्जी गेममुळे त्याच्या आयुष्याची दोरी तुटली

ठाणे/क्राईम रिपोर्टर

मोबाईलवरील गेम आजकाल मुलांसाठी जीवघेणे ठरत आहेत. कारण या गेमच्या आहारी गेलेल्या काही मुलांचा दुखद शेवट झाला आहे. काहींनी आत्महत्या केल्या तर काहींचे खून झालेत. म्हणूनच भारत सरकारने काही गेम्सवर बंदी सुद्धा घातली होती. मात्र पब्जी सारखे घातक गेम अजूनही सुरु आहेत आणि या पब्जीच्या नादात अनेक मुलांचे मानसिक स्वस्थ बिघडले आहे. ठाण्यातील वर्तक नगरात पब्जीचे वेड लागलेल्या आणि नेहमीच या गेममध्ये जास्त मिम्स मिळवून जिंकणाऱ्या साहिल जाधव या २० वेषीय तरुणाचा त्याच्याच तीन अल्पवयीन मित्रांनी खून केला. या तिन्ही आरोपी मुलांवर गुन्हा दाखल करून त्यांना बाल सुधारगृहात पाठवण्यात आले आहे.



ठाण्याच्या वर्तकनगर परिसरात मोबाईलवरील पब्जी खेळ खेळणे चांगलेच महागात पडल्याची घटना घडली आहे. पब्जी खेळत वारंवार अधिकाधिक मोहरे टिपत जिंकत असल्याचा राग मनात धरून आपल्या २० वर्षीय मित्राचा मित्रांनीच खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मित्राचा खून करण्यात मुख्य आरोपीसह दोन अल्पवयीन तरुणांचा समावेश आहे. या तिघांवर वर्तकनगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी मुख्य आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला ...पान २ वर

## अनैतिक संबंधाचा सुखी संसाराला फटका बसला पतीचा काटा काढण्याचा पत्नीचा डाव फसला

मुंबई/एस.कुमार

अनैतिक संबंध फार काल लपून राहत नाहीत ते कधीना कधी उघडकीस येतात. त्यामुळे समाजात बदनामी होते म्हणूनच काही लोक आपले बिंग फुटून समाजात अब्रूचे धिंडवडे निघू नयेत म्हणून टोकाचा निर्णय घेऊन एखाद्याच्या जीवावर उठतात. मुंबईतील अंधेरीत अशाच एका घटनेत पत्नीचे विवाहबाह्य संबंध उघडकीस आल्याने संसार तुटणार आणि आपली बदनामी होणार या भीतीने त्या विवाहितेने प्रियकराच्या मदतीने पतीचा काटा काढण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या मारेकऱ्यांकडून पतीवर झालेल्या गोळीबारात पती केवळ जखमी झाला आणि तिचा पतीच्या हत्येचा प्लान फसला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीसह तिच्या प्रियकरालाही अटक केली आहे.

पतीपत्नीचे नाते हे पवित्र मानलं जातं. अग्नीला साक्षी ठेवून सात जन्म सोबत राहण्याचे वचन त्यांनी एकमेकांना दिलेलं असते . मात्र हल्लीच्या युगात वैवाहिक जीवनात बऱ्याच अडचणी येत असल्याने पतिपत्नीने लग्नात दिलेले वचन पाळणे शक्य होत नाही. आर्थिक,सामाजिक, व लैगिक गरजा भागविण्यासाठी माणूस सतत धडपडत असतो.त्यामुळे पतिपत्नीच्या नात्यात दुरावा निर्माण होतो. त्यातुन सुखाचा संसार दुःखमय व्हायला वेळ लागत नाही. हल्लीच्या चंगळवादी संस्कृतीमुळे सैराचार वाढत चालला आहे. स्त्री पुरुषाचे अनैतिक संबंध प्रस्थापित होत असल्याने कुटूंबात ...पान ६ वर

## दारुड्या पतीला संशयाने घेरले रागाच्या भरात पत्नीला ठार मारले

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत मायाबाई

काही माणसांचे वय वाढले तरी त्यांची अक्कल मात्र आहे तशीच असते. तीन मुलींची लग्न होऊन त्यांना पोरेबाळे झाली तरी मुखेडमध्ये राहणारा प्रकाश आपल्या वृद्ध पत्नीवर संशय घेत असे. याच संशयातून ती त्याला सोडून गेली होती. मात्र सासरच्या मंडळींनी तिची समजूत काढून पुन्हा तिला त्रास होणार नाही असे लेखी लिहून देवून दोन वर्षानी तिला घरी आणली. पण प्रकाशमध्ये सुधारणा झाली नाही आणि एकेदिवशी ती ज्या ठिकाणी उपचारासाठी गेली होती तिथे जावून त्याने तिचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी प्रकाशला अटक केली आहे.





आरोपी प्रकाश

मायाबाई आणि प्रकाश यांचा संसार अर्ध्यावर आला होता. त्यांच्या संसाराची जणू दुपार झाली होती. औरंगाबाद जिल्ह्याच्या सोयगाव तालुक्यातील मुखेड या गावी दोघे पती पत्नी रहात होते. मायाबाई चार मुलांची आई होती. तिच्या चारपैकी तिघा मुलांचे लग्न देखील झाले होते. संसाराचा भलामोठा पल्ला गाठल्यानंतर देखील मायाबाईचा पती प्रकाश तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. चारित्र्याच्या संशयातून तो मायाबाईला मारहाण व शिवीगाळ करत होता. प्रकाशला दारु पिण्याचे भारी व्यसन होते. दारुच्या आहारी गेलेला प्रकाश दारुचे पेग ...पान ६ वर

## पान १ वरून....

### दार उघडे ठेवणे त्यांना महागात...

शिरलेल्या चोरांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. यात पतीचा मृत्यू झाला, तर पत्नी गंभीर जखमी आहे. तुमसर तालुक्यातील कोष्टी गावात मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे. मुरलीधर नत्थू किरनापुरे (वय ४०) राहणार कोष्टी असं मृतकाचे नाव असून सिंधु मुरलीधर किरणापुरे असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी तुमसर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद केला असून तुमसर पोलिस फरार आरोपीचा शोध घेत आहेत. कोष्टी गावात राहणाऱ्या किरणापुरे कुटुंब आपल्या नित्याचे कामे करून रात्रीच्या सुमारास झोपी गेले होते. त्यांचे दोन्ही मुलं क्रिकेट बघण्यासाठी गेले असल्याने परत येणार म्हणून त्यांनी दरवाजे उघडे ठेवले होते. दरम्यान चोरीच्या बहाण्याने त्याच गावातील आरोपी संजय नगरधने हा किरणापुरे कुटुंबाच्या घरात आला. मात्र मौल्यवान वस्तूचा शोध घेत असताना चोरट्याच्या हालचालीमुळे मृतक मुरलीधर आणि त्याच्या पत्नीला जाग आली आणि चोरटा नजरेस पडला. आता आपला चोरीचा डाव फसला आणि आता आपण पकडले जाऊ या भीतीने आरोपीने त्याच्या जवळील असलेला चाकूने दोघांवरही पती-पत्नीवर वार करुन घटना स्थळावरून आरोपीने पळ काढला. शेजारी असणाऱ्या नागरिकांना किरणापुरे कुटुंबांच्या घरातून आरडाओरडा केल्याचा आवाज आल्याने शेजारी एकत्र येऊन जखमी पती-पत्नींना उपचारासाठी भंडारा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान मुरलीधर किरणापुरे याचा जास्त रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला. तर पत्नीवर भंडारा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत तपास सुरू केला आहे.

### ग्रामीण भागातील प्रवाशांचे तुमच्यामुळे ...

संपकरी कामगारांना भडकवत आहे आणि सरकार तमाशा बघतयं. लोकांना खोटं बोलून भडकावणे हा गुन्हा नाही का? एसटी महामंडळ प्रचंड तोट्यात आहे. सरकारवर चार लाख कोटींचे कर्ज आहे. अशात आज एसटी कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेतले तर उद्या इतर महामंडळे उठतील संप करतील. लोकांना वेठीस धरतील. त्यांचेही सरकार पाय धरणार आहे का? म्हणूनच एसटी कामगारांचे आता अति झाले आहे, त्यांच्यावर जास्तीत जास्त कठोर कारवाई करावी अशी महाराष्ट्रातील चार कोटी एसटी प्रवाशांची मागणी आहे. कारण आता प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत होतोय. तेंव्हा सरकारने आणि विरोधी पक्षांनीही एसटी प्रवाशांच्या हालाकींचाही विचार करावा. एसटी कामगारांच्या बेकायदेशीर संपला अभय देऊन चार कोटी प्रवाशांचा कायदेशीर प्रवासाचा हक्क डावलणाऱ्या सरकारने आणि विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडेल असे काहीही करू नये. कारण प्रवाशांना आता अधिक संयम राखणे कठीण आहे.

### संशयाने प्रियकर अगदी वेडापिसा ...

शुभमच्या मनात मात्र आस्था विषयी वेगळेच विचार येत होते. ती त्याला पंसत होती. त्याची ती चॉईस होती, परंतु ज्यावेळी शुभमच्या घरच्या लोकांना त्याचे आणि आस्थाचे प्रेमप्रकरण समजले त्यावेळी त्यांनी त्याच्या प्रेमाला विरोध केला. त्याच्या घरच्या लोकांनी त्याला लग्नासाठी दुसऱ्या मुलीचा विचार करण्यास सांगितले होते. पण त्याला तर आस्थाशीच लग्न करायचे असल्याने त्याने तसा हट्ट आपल्या घरच्यां लोकासमोर धरला होता. त्यामुळे त्याचे त्याच्या घरच्या लोकाशी या कारणातून भांडणे होत होती. त्यातच त्याला अलिकडे आस्थाचे वागणे ही खटकू लागले होते. ती तिच्या मोबाईलवरून सतत दुसऱ्या कुणाशी तरी बोलत असायची, त्याच्याशी मोबाईलवरून चॅटिंग करीत असायची हे त्याला पटत नव्हते. त्यामुळे तो सारखा तिच्यावर संशय घेत तुझे माझ्या व्यतरिक्त दुसऱ्या कोणाबरोबर तरी प्रेमसंबंध आहेत असे म्हणून तो तिच्याशी भांडण काढत होता. तो लग्नाआधीच तिच्यावर संशय घेवू लागल्याने ती ही त्याला नको ते बोलत होती. तुझे जर माझ्यावर खरे प्रेम असेल तर आपण लग्न करूया म्हणत होती. पण त्याच्या लग्नाला त्याच्या घरातूनच विरोध असल्याचे तो तिला सांगू शकत नव्हता. तो लग्न करण्यासाठी टाळा टाळ करीत आहे याची कल्पना तिला आली होती. त्यामुळे ती त्याचेवर लग्नासाठी दबाब टाकत होती. पण तो उलटे तिच्याच चारित्र्यावर संशय घेऊन भांडण काढत होता. प्रेमात आणि युध्दात सर्व काही माफ असते असे म्हणतात ते बरोबर आहे एकमेकाच्या गुण दोषासह स्विकारणे हाच खरा पर्याय असतो. आस्थाच्या घरच्या लोकांना मात्र तिचे शुभमबरोबरचे प्रेमप्रकरण समजलेले नव्हते. ती बाहेर काय करते कुणाशी तिची मैत्री आहे याचा थांगपत्ता तिने कुणाला लागू दिलेला नव्हता. त्यातूनच ती अजूनही शुभमला चोरून भेटत होती. त्याच्याशी लग्न करूनच ती आपल्या घरच्या लोकाना सांगणार होती. तिच्या मनाचा अंदाज तिने आई वडिलांना लागू दिलेला नव्हता. आपली मुलगी आता उपवर झाली आहे ती शिक्षणात हुशार आहे तिला तिच्या पायावर उभे राहण्यास मदत करायचे एवढेच त्याना माहित होते. त्यातच घटनेच्या आधी एक दिवस अगोदर आपल्या आई सोबत राळेगाव येथे गेली असता तिच्या मोबाईलवर सारखा कोणाचा तरी फोन येत होता. तो फोन ती आईच्या माघारी रिसीव्ह करीत होती तर आई समोर कट करीत होती.याबाबत तिच्या आईने तिला विचारले असता ती आपल्या कॉलेजमधून आपल्या मैत्रीणीचा फोन असल्याचे तिने सांगितले यावर देखील तिच्या आईचा विश्वास बसला होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरूवार दि.३ मार्च २०२२ रोजी सकाळी तिने घरातून निघताना आपल्या आईला आपण कॉलेजमध्ये शिष्यवृत्तीचा फॉर्म भरावयचा आहे असे सांगून सकाळी १० वाजणेच्या सुमारास आपली स्कुटी घेऊन बाहेर पडली. त्यावेळी ती कॉलेजला न जाता शुभमने बोलविलेल्या ठिकाणी म्हणजे लोहारा एमआयडीसीतील एका निर्जन स्थळी गेली. ती येण्या अगोदरच तो तेथे आपल्या बाईकवरून आला होता. ती आल्यावर ते दोघे झाडा झुडपाच्या आडोशाला जावून निवांतपणे बसले. तिने चेहऱ्यावर स्कार्प गुंडाळलेला होता. ते दोघे गप्पा मारत बसले असताना तो तिला आपल्या मिठीत घेऊन तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करीत होता. तिला मात्र ते आवडत नव्हते. कारण त्याने अगोदर तिच्यासमोरच दारू ढोसली होती. तो दारूच्या नशेत आपल्या अंगाशी झोंबाझोबी करीत आहे हे तिला मान्य नव्हते. त्यातच तिने लग्नाचा विषय काढल्यावर तो जास्तच भडकला होता. याला कारण ही तसेच होते कारण तिने तिच्या इनस्ट्रग्राम अंकाऊंटवर त्या दोघाचे एकत्रीत फोटो अपलोट केले होते. त्यातीलच एक फोटो तिने आपल्या स्टेटसला ही ठेवलेला होता. यावरून त्या दोघात भांडण वाढीस लागलेले होते. त्याचे मते तिचे दुसऱ्या तरूणाशी अफेयर असताना आपले फोटो तिने का इनस्ट्रग्रामला स्टेटसला ठेवायचे? ती त्याला लग्नाचा तगादा लावत होती. पण त्याला तिच्याशी लग्न करायचे नसल्याने तो तिला टाळू लागला होता. ती त्याला भांडणात म्हणाली, माझा वापर करायला तुला पाहिजे आणि लग्न करायला नको का? असे म्हणत ती त्याचेवर तोडसुख घेत असताना तो जास्त चिडला. अगोरदच तो दारूच्या नशेत असल्याने त्याने बाजुलाच पडलेला एक मोठो दगड उचलला आणि तिला काही समजण्याच्या आत तिच्या चेहऱ्यावर घातला. त्यासरशी ती ओरडत रक्ताच्या थारोळ्यात पडली. तिचे तोंडावर दगड घातला गेल्याने तिचे सगळे दात बाहेर पडले होते. आपल्या हातून आपल्या प्रियेसीचा खून झाल्याचे बघून त्याने आता आपली काही खैर नाही असे म्हणत दारूच्या नशेत आपल्या हाताची नस कापून घेतली आणि तो तेथेच तडफडत पडला. तो बेशुध्द अवस्थेत पडला असल्याने त्याची ही हालचाल मंदावली होती. काही वेळाने तेथून जाणाऱ्या एका इसमाची नजर झाडाझुडपातील पडलेल्या तरूणावर गेल्यावर त्याने जवळ जावून पाहिले तर त्या तरूणाची हालचाल चालू असल्याचे त्याला दिसले. त्याच्या शेजारीच एक तरूणी मृतावस्थेत पडलेली होती. तिचा चेहरा दगडाने ठेचलेला होता. तिच्या तोंडातून दात बाहेर आले होते. तर बाजुलाच रक्ताने माखलेला दगड पडलेला होता. हे पाहून तो इसम घाबरला. त्या ही परिस्थीती त्याने या घटनेची माहिती लोहरा पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी अवस्थेतील शुभम याला उपचारासाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिले. मयत तरूणीच्या कडील कागदपत्रावरून पोलीसांनी तिची ओळख पटविली होती. या घटनेची माहिती तिच्या घरच्या लोकांना दिल्यावर ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. एव्हान ही घटना कोणत्या कारणातून कुणाकडून घडली याची माहिती त्याना मिळाल्यावर ते ही भांबावून गेले होते. आपल्या मुलीची प्रेमसंबंधातून हत्या झाल्याची माहिती मिळताच तिच्या आईने हंबरडा फोडला होता. तिचा या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी जखमी अुभम बकाला याचेकडून घेतली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. मयत आस्था तुंडबे हिच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी आस्था सुरेश तुंडबे (वय १८) हिच्या खूनप्रकरणी तिचा प्रियकर शुभम अशोक बकाल (२०) याचे विरूध्द लोहारा पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२,३०९ नुसार गुन्हा नोंदविला. या घटनेची माहिती प्रसारमाध्यमांना देताना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेतील संशयीत आरोपी शुभम अशोक बकाल याला उपचारानंतर ताब्यात घेतले जाईल व त्याने हा गुन्हा कोणत्या कारणातून का आणि कशासाठी केला याची उकल करण्यात येईल. प्राथमिक माहितीनुसार शुभम याने प्रियेसी आस्था हिचा खून संशयावरून केल्याचे सांगितले असले तरी यामागे आणि दुसरे तिसरे कोणते कारण आहे का याचा तपास लोहरा पोलीस करीत आहेत.

### वयस्कर महिलेने गोड बोलून घात...

पोलीस करत आहेत. रमेश रवींद्र मोरे असं आत्महत्या करणाऱ्या २५ वर्षीय तरुणाचं नाव असून तो भुसावळ येथील रहिवासी आहे. मागील एक वर्षांपासून रमेशचं नाशकातील एका ४५ वर्षीय महिलेसोबत प्रेमसंबंध सुरू होते. मृत रमेश आरोपी महिलेच्या प्रेमात इतका आंधळा झाला होता की, तो महिलेच्याच घरी राहू लागला होता. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी महिलेला चार मुलं आहेत. असं असूनही आरोपी महिला २५ वर्षीय रमेशवर लग्नासाठी दबाव टाकत होती. रमेशनं गावाकडे जाऊन अन्य कुणाशी लग्न करू नये, असं तिला वाटत होतं. त्यामुळे ती रमेशला मानसिक आणि शारीरिक त्रास देत होती. आरोपी महिलेच्या छळाला कंटाळून अखेर रमेशनं आपल्या प्रेयसीच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. हा धक्कादायक प्रकार घडल्यानंतर आरोपी महिलेनं पुरावा नष्ट करण्यासाठी आपला मुलगा आणि अन्य एका तरुणाच्या मदतीने रमेशचा मृतदेह महामार्गावर टाकून दिला. तसेच रमेशचा अपघातात मृत्यू झाल्याचं भासवलं. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अडगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पण शवविच्छेदन अहवालामुळे रमेशचा मृत्यूचं गूढ उलगडलं आहे. शवविच्छेदन अहवालात रमेशनं गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं स्पष्ट झालं. त्या अनुषंगाने पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केल्यानंतर, रमेश हा भुसावळ येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी मृताच्या घरी जाऊन तपास केला असता तो ओझर परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली. तसेच मागील एक वर्षापासून त्याचं एका महिलेशी प्रेमसंबंध सुरू असल्याचीही माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आलं. पोलिसांनी आरोपी महिलेसह तिचा मुलगा आणि मुलाच्या मित्राविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### मैत्रीतील गद्दारीमुळे मयुर चिडला ...

जात होता. मयुर मात्र सावध झाला होता. तो निखीलच्या प्रत्येक हालचालींकडे संशयी नजरेने बघत होता. दरम्यान मयुरला त्याच्या आणखी एका मित्राने त्याची पत्नी व निखीलच्या संबंधाबाबत छेडले. आता मात्र मयुर कमालीचा अस्वस्थ झाला. त्याचे पित्त खवळले होते. दि. २० व २२ डिसेंबरच्या दरम्यान मयुरने त्याच्या पत्नीला खडसावले. त्यावरुन दोघा पती - पत्नीत वादाची ठिणगी पडली. याची परिणीती हाणामारीत झाली. मयुरने त्याच्या पत्नीला बेदम मारहाण केली. त्यामुळे मयुरची पत्नी जबर जखमी झाली. मयुरच्या भावांनी तिला दवाखान्यात दाखल केले. या घटनेची माहिती निखिलपर्यंत जाण्यास वेळ लागला नाही. चिडलेला मयुर व त्याचे भाऊ निखीलचा शोध घेत होते. मयुर व त्याचे भाऊ आपल्या मागावर असल्याचे निखील यास समजले. त्यामुळे २७ डिसेंबर पासून निखील बेपत्ता झाला. निखील बेपत्ता झाल्याचे समजाताच मयुर शार्दुल, मनोज शार्दुल आणि मुकेश शार्दुल हे तिघे भाऊ निखीलचा कसून शोध घेऊ लागले. आपल्या जीवाला धोका असल्याचे निखीलच्या लक्षात आले होते. निखील बेपत्ता असल्यामुळे तिघा भावांच्या संशयाला मोठ्या प्रमाणात वाव मिळाला होता. मयुर, मनोज व मुकेश या तिघा भावांनी निखीलचा शोध सुरुच ठेवला. मात्र त्याचा कुठेही तपास लागत नव्हता. दि. ३० डिसेंबर २०२१ रोजी निखिल साहेबराव पाटील हा बेपत्ता असल्याची फिर्याद त्याच्या नातेवाईकांनी धुळे शहर पोलीस स्टेशनला दाखल केली. मिसिंगची फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलिस निखिलचा शोध घेण्याअगोदर मयुर शार्दुल व त्याचे दोघे भाऊ मनोज आणि मुकेश हे निखिलचा समांतर शोध घेत फिरत होते. मयुर आणि निखिल हे अगदी जवळचे मित्र असल्याने निखिलच्या सर्व नातेवाईकांची, त्यांच्या घरा-दारांची मयुरला माहिती असल्याने त्यादृष्टीने त्यांचे शोधकार्य सुरु होते. दरम्यान निखिल हा शिरपूर तालुक्यातील शिंगवे गावातील नातेवाईकांकडे असल्याची माहिती मिळाल्याने आपल्या मित्रासोबत मयुर, मनोज आणि मुकेश हे तिथे शार्दुल बंधू गाडी करुन शिंगवे गावाला गेले. तेथे त्यांना निखिल आढळला नाही. त्यामुळे संतापात त्यांनी किरण मनोहर पाटील नावाच्या निखिलच्या नातेवाईकाचे अपहरण करुन त्याला धुळ्यात आणले. निखिल कुठे दडून बसला हे किरण पाटील याने सांगावे म्हणून मयुर शार्दुलसह त्याच्या दोघा भावांनी किरणला बेदम मारहाण केली. परंतु किरणकडून निखिल संदर्भात काहीही माहिती मिळू शकली नाही. निखिलचा शोध घेण्यासाठी तत्पर असलेल्या मयुर शार्दुल व त्याच्या दोघा भावांनी निखिलच्या घराकडे मोर्चा वळवला. निखिलच्या काकाच्या घरात त्यांना निखिलचा भाऊ दिपक पाटील हा आढळून आला. रागाच्या भरात तिघा भावांनी दिपकला जबर मारहाण करत त्याच्याकडे निखिल संदर्भात माहिती विचारली. दिपकने निखिलबाबत माहिती देण्यास असमर्थता दाखवली. निखिलच्या काकाकडून, भावाकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही म्हणून मयुर शार्दुल व त्याचे दोघे भाऊ निखिलच्या मामाच्या घरी पोहोचले. त्यांनी निखिलच्या मामांना व त्यांच्या कुटुंबीयांना धमकावले. निखिलबाबत माहिती दिली नाही किंवा त्याला बोलावले नाही तर तुम्हाला जिवानिशी मारु असे तिघांनी त्यांना धमकावले. निखीलला रात्री आठ वाजता स्वराज जीम जवळ पाठवा असा निरोप मयुर शार्दुलने निखीलच्या मामांना दिला. तिघा शार्दुल बंधूंच्या दहशतीला घाबरुन निखीलच्या मामांनी सर्व जण बाहेर गेल्यानंतर त्याला फोन करुन हकीकत कथन केली. धुळ्यात आल्यास शार्दुल बंधू आपल्याला मारुन टाकतील असे निखीलने त्याच्या मामांजवळ भिती व्यक्त केली. तशी भिती त्याच्या मामांनी शार्दुला बंधूजवळ व्यक्त करत प्रकरण समजून उमजून मिटवून घेण्यास विनंती केली. आम्ही त्याला मारणार नाही मात्र तो आला नाही तर वातावरण चिघळेल असे शार्दुल बंधूंनी निखीलच्या मामांना सांगितले. अखेर मन घट्ट करुन निखील ४ फेब्रुवारी रोजी धुळ्यात अगोदर त्याच्या मामांकडे आला. निखील यास त्याच्या मामांनी मयुर शार्दुलला भेटण्यास पाठवण्यापुर्वी व्यवस्थित समजावून सांगितले. या प्रकरणावर पडदा टाकून विषय संपवून ये असे देखील मामांनी निखील यास बजावले. मयुर शार्दुल व त्याच्या भावांची दहशत निखील यास माहिती होती. तो आता चांगलाच घाबरला होता. मयुर आपला जीवाभावाचा मित्र असल्यामुळे त्याची माफी मागीतल्यास तो आपल्याला समजून घेईन. तसेच आपल्यामुळे आपल्या नातेवाईकांना होणारा त्रास बंद होईल अशी आशा निखील मनाशी बाळगून होता. ठरल्यानुसार शुक्रवार दि. ४ फेब्रुवारी २०२२ रोजी रात्री साडे आठच्या सुमारास स्वराज जीमजवळ मयुर शार्दुलला भेटाण्यास निखील गेला. रात्री साडेआठच्या दरम्यान निखिल स्वराज जीमजवळ जाताच मयुर शार्दुल, मनोज शार्दुल आणि मुकेश शार्दुल व त्याच्या सहकाऱ्यांनी निखिलला घेरले. ज्या ताटात जेवलास त्याच ताटात विष्ठा केलीस असे म्हणत लाथा - बुक्क्यांनी, लाठया - काठ्यांनी निखिलला बेदम मारहाण करण्यात आली. त्या मारहाणीत निखिलची प्राणज्योत मालवली. निखिल मरण पावल्याची खात्री होताच तिघा शार्दुल बंधूंनी घटनास्थळावरुन पलायन केले. या घटनेची माहिती मिळताच निखिलचा भाऊ दिपक साहेबराव पाटील याने शहर पोलीस स्टेशन गाठत घटनेची हकीकत कथन केली. आपला भाऊ, निखिल साहेबराव पाटील याचा मयुर मच्छींद्र शार्दुल, मुकेश मच्छिंद्र शार्दुल, मनोज मच्छिद्र शार्दुल तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी खून केल्याची फिर्याद धुळे शहर पोलीस स्टेशनला दिली. निखिल साहेबराव पाटील या २२ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या झाल्याचे समजताच शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख व त्यांचे सहकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब पाटील, संतोष तिगोटे, सतिश कोठावदे, विलास भामरे, मुक्तार मन्सुरी, दिनेश परदेशी, कुंदन पटाईत, राहुल सोनावणे, शाकीर शेख, प्रसाद बाघ, अविनाश काड, तुषार मोरे, प्रविण पाटील, मनिष सोनगिरे आदीसह घटनास्थळी धाव घेतली. जिल्हा पोलीस अधीक्षक प्रविण पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, पोलीस उपअधीक्षक दिनकर पिंगळे यांनीही घटनास्थळी धाव घेत परिसरात चोख बंदोबस्त राखला. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळासह मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. मृतदेह उत्तरीय तपासणीकामी हिरे शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवण्यात आला. दिपक साहेबराव पाटील याच्या फिर्यादीनुसार धुळे शहर पोलीस स्टेशनला मयुर शार्दुल, मनोज शार्दुल आणि मुकेश शार्दुल व इतर साथीदारांविरुद्ध भादंवि. ३०२, ३२६, ३६४ (अ), ३४ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. संशयित आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली.

### जमिनीचा वाद त्याच्या प्राणावर बेतला...

देणाऱ्याला त्या शेतीची अपेक्षीत किंमत मिळत नाही म्हणून तो करार मोडण्याचा आणि मला माझी शेती विकायची नाही किंवा तुम्हाला ती दयायची नाही असा पवित्रा घेतो त्यातून मग वाद आणि भांडण ठरलेलेच असते. कबनुर येथील मुनीफ महम्मद हुसेन सतारमेकर याचंकेडून साजणी येथील नितीन कोनोरे यांनी गेल्या काही वर्षापूर्वी ठराविक रक्कम व्याजाने घेतलेली होती. सतारमेकर हे इचलकरंजी अर्बन बँकेच माजी संचालक होते. त्याची परिस्थीती ही सधन होती. कबनुर शहरात त्याच्या शब्दाला मान होता. चार लोकात त्याची उठबस होत होती. चार पैसे शिल्लक राखून असल्याने ते काही लोकाच्या मदतीला पडत होते. ते ठराविक लोकांना व्याजाने पैसे देत होते. तसे त्यांनी नितीन कोनोरे यांना ही लाखाच्या घरात रक्कम व्याजाने दिलेली होती. त्या दोघात पूर्वीपासून मैत्रीचे आणि घरोब्याचे संबंध असल्याने सतारमेकर यांनी ही ती रक्कम नितीन कोनारे यांना दिली होती. बरेच वर्ष झाली तरी कोनोरे हे सतारमेकर यांना घेतलेली रक्कम परत करीत नव्हते. सतारमेकर हे कोनोरे याचेकडे ती रक्कम सारखे परत मागत होते. पैस मागून मागून सतारमेकर हे थकले होते. कोनोरे हे काही केल्या पैसे देत नसल्याने त्यांनी काही मध्यस्थी लोकांना घालून कोनोरे याची शेतजमीन आपण दिलेल्या रक्कमेपोटी लिहून घेतलेली होती. ही रक्कम लाखाच्या घरात असल्याने तसा त्यांनी नितीन कोनोरे यांच्या साजणी येथील संकाण्णा मळा येथील शेतजमीन गहाण खताने घेतलेली होती. त्यांला ही त्यांनी मुदत घालून दिली होती. त्या मुद्दतीत कोनोरे यांनी पैसे परत दिले तर सतारमेकर हे त्याच्या शेतीवरील त्यांचा हक्क सोडणार होते. त्या मुदत्तीत त्यांनी ती रक्कम परत दिली नाही तर सतारमेकर यांनी दिलेल्या रक्कमेपाटी ती शेती ते विकत घेणार होते असा त्या दाघात व्यवहार झाला होता. ठराविक मुदतीत नितीन कोनोरे यांनी सतारमेकर यांना पैसे न दिल्याने सतारमेकर यांनी मध्यस्थी लोकाच्या मदतीने कोनोरे याची शेतजमीन आपण दिलेल्या रक्कमेपोटी खरेदी करून घेतली होती. त्यामुळे नितीन कोनोरे याना त्या शेतजमीनाचा म्हणावा तसा मोबदला मार्केट रेट प्रमाणे मिळालेला नव्हता. सतारमेकर यानी त्याची शेतजमीन ही व्याजाच्या रक्कमेपाटी घेतली आहे म्हणूद नितीन हे सतारमेकर यांना त्यांनी विकत घेतलेल्या शेतीत पाय ठेवू देत नव्हते यातून त्या दोघात वाद विवाद चालू झाला होता.बऱ्याच वेळेला मोठी भांडणे होऊन हाणामारी ही झाली होती. तुम्ही माझी शेती व्याजाच्या रक्कमेत फुकट घेतली आहे असा नितीन हा त्याचेवर आरोप करीत होता. हा वाद पोलीस स्टेशनपर्यत पोहचला होता.तेथे पोलीसांनी त्याचेत समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण दोघे ही कुणाचेच ऐकण्यास तयार नसल्याने हा वाद चिघळला होता. त्याच्या या वादात साजणी गावातील काही लोकांनी मध्यस्थी करून वाद मिटविण्याचा प्रयत्न केला होता. पण वाद काही मिटला नव्हता. त्यातच नितीन कोनोरे हे आपल्याला शेतात पाय ठेवू देत नाहीत म्हणून सतारमेकर यांनी त्या शेतात आपल्या जनावरांचा गोठा बांधलेला होता. सतारमेकर हे जनवाराचां गोठा बांधून आपल्याला अडचण करीत आहेत असे नितीन याचे म्हणणे होते. त्या गोठयावरून ही तो त्याचेशी भांडत होता. चार लोकात देखील हा वाद मिटत नसल्याने दोघे ही एकमेकांवर चिडून होते. शेतजमीन विकत घेऊन ही सतारमेकर याच्या ताब्यात येत नव्हती.तर मला माझ्या शेताची किंमत ही बाजारभावाप्रमाणेच पाहिजे असे मत नितीन याचे पडले होते.त्यामुळे तो सतारमेकर याना त्या शेतजमीनीत पाय ठेवू देत नव्हता. जर तुम्ही इकडे आलात तर तुमचा मी मुडदाच पाडतो अशी त्याने त्याना धमकी दिलेली होती. तरी सतारमेकर हे शेताकडे जात येत होते. बुधवार दि.२ मार्च रोजी ते शेताकडे गेले असता तेथे नितीन बरोबर त्याची वादावादी सुरू झाली होती. तो त्याचे अंगावर धावून जात होता. नेहमी प्रमाणे त्या दोघाची वादा वादी सुरू असले म्हणून मळ्यातील लोकांनी ही त्याचे भांडणाकडे दुर्लक्ष केले होते. नितीन याने अगोदरच सकाळ सकाळी दारू ढोसली होती. त्यामुळे भांडणात त्याला चेव चढत होता. तो त्याना अर्वाच्च भाषेत शिव्या ही देत होता. तर सतारमेकर ही त्याला त्याच शब्दात उत्तर देत होते. त्यावेळी नितीन याला राग अनावर झाला होता. बरेच वर्ष झाली तुम्ही माझ्या मागे साडेसाती लावलेली आहे असे म्हणत त्याने खोलीत ठेवलेली कुऱ्हाड उचलली आणि सतारमेकर याच्या डोक्यावर मानेवर घातली. त्यासरशी सतारमेकर हे जागीच रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडले. त्याच्या ओरडण्याने काही तरी विपरीत घडले आहे हे ओळखून संकाण्णमळा येथील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली होती. घटनास्थळी सतारमेकर हे रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडले होते. आपल्या हातून त्याचा खून झाल्याचे बघून नितीन हा हताश होऊन जागीच बसला होता. बाजुलाच रक्ताने माखलेली कुऱ्हाड पडली होती. बघता बघता ही घटना साजणी गावात वाऱ्यासारखी पसरली. जो तो घटनास्थळी धाव घेत होता. अशातच नितीन कोनोरे हा या घटनेनंतर पळून न जाता तो सरळ हातकणंगले पोलीस स्टेशनला स्वतःडून हजर होऊन खूनाची घटना आपल्या हातून घडल्याचे पोलीसांना सांगितले. या घटनेची माहिती मिळताच पो.निरी.के.एन पाटील यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाची पाहणी केली. हातकणंगले पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी हातकणंगले ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक बी.बी. महामुनी यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली होती. त्यांनी तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसाना केल्या होत्या. संशयीत आरोपी नितीन कोनोरे हा स्वत:हून पोलीस स्टेशनला हजर झाला असल्याने व त्याने गुन्हा कबुल केल्याने सदरची घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसाना आलेला होता. या घटनेची लेखी फिर्याद हातकणंगले पोलीस ठाण्यात मयत सतारमेकर यांच्या नातेवाईकांनी दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मुनाफ मंहमद सेुन सतारमेकर (वय ६२) रा.कबनुर याच्या खून प्रकरणी नितीन भाऊसो कोनारे (वय ३२) रा.साजणी याचे विरोधात गु.रजि.नं./२०२२ भा.दं.वी.कलम ३०२,३४ सह गुन्हा दाखल करून त्याला हातकणंगले येथील मा.कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कुऱ्हाड जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास पो.निरी. के.एन पाटील याच्या मार्गदर्शनाखाली हातकणंगले पोलीस करीत आहेत. शेतजमीनीचा वाद हा वेळीच मिटला नाही तर त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

### मोबाईलवरील गेम खेळताना वेळकाळ ...

न्यायालयाने ६ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तर, इतर दोन अल्पवयीन आरोपींना भिवंडी बाल न्यायालयात हजर केले असता त्यांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. ठाण्यातील वर्तकनगर परिसरातील जानकादेवी नगर, जुनी पाईपलाईन परिसरात राहणारा साहिल जाधव हा २० वर्षीय तरुण मोबाईल पब्जी खेळात चांगलाच तरबेज होता. नेहमीच जास्त किल्स मिळवून तो सतत खेळ जिंकत असे. याच कारणावरून साहिल आणि त्याच्या साठीदारांमध्ये नेहमीच वाद होत असे. याचाच राग मनात धरून त्याच्यासोबत पब्जी खेळ खेळत असलेल्या त्याच्या साथीदारांनी त्याचा काटा काढण्याचे ठरवले. साहिलच्या तीन मित्रांनी त्याला घराजवळ असलेल्या गल्लीजवळ गाठले आणि त्याच्या अंगावर चाकू सुरीच्या सहाय्याने सपासप वार करून पळ काढला. या प्रकरणी या तीनही आरोपींच्या विरोधात वर्तकनगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्तकनगर पोलिसांनी साहिलची हत्या करणाऱ्या तिनही जणांना अटक केली आहे. प्रणव प्रभाकर माळी (१९), राहुल महादेव गायकवाड (१७), गौरव रवींद्र मिसाळ (१७) अशी या तीनही आरोपींची नावे आहेत. यामध्ये प्रणव माळी हा मुख्य आरोपी असून इतर राहुल आणि गौरव हे दोघेही अल्पवयीन आहेत. प्रणव माळी याला पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर इतर दोन आरोपी राहुल आणि गौरव हे अल्पवयीन असल्याने त्यांना भिवंडी येथील बाल न्यायालयात हजर करण्यात आले असता बाल न्यायालयाने या दोघांची बालसुधारगृहात रवानगी केली आहे. या संपूर्ण प्रकरणात प्रणव प्रभाकर माळी हा मुख्य आरोपी आहे. त्याच्या विरोधात या आधी देखील मारहाण केल्याचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर इतर दोन अल्पवयीन आरोपींना ही कस्टडीमध्ये घेण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे वर्तकनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदाशिव निकम सांगितले. साहिल जाधव हा आपल्या आई वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याचे आई वडील हे दोघेही मध्यमवर्गीय घरचे असून कामानिमित्त बाहेर असतात. साहिलची आई ही घरकाम करते आणि वडील हातगाडी लावून आपल्या घरचा उदरनिर्वाह करतात. मात्र त्यांच्या एकुलत्या एक मुलाच्या हत्येनंतर त्यांच्यावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. मात्र कामानिमित्त व्यस्त असलेल्या अशा पालकांनी आपल्या पाल्याकडे लक्ष देणे गरजेचे असून मुलगा नेटवर्किंगचा गैरवापर करून पोर्न साईट किंवा पब्जी सारखे खेळ खेळात नाही ना, त्याच्या आहारी जात नाही ना याकडे देखील लक्ष दिले पाहिजे असे आवाहन देखील वर्तकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदाशिव निकम केले आहे.

07 TO 13 MARCH 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:44 PM Page 1



# तो वादग्रस्त नगरअभियंता पुन्हा देवणीत!

**देवणी/प्रतिनिधी**




देवणी येथील नगरपंचायतला गेल्या चार वर्षापूर्वी पासुन होत असलेल्या नगर पंचायत देवणी अंतर्गत विविध विकास कामामध्ये सिमेंट रस्ता असेल नाली बांधकाम असेल किंवा रमाईच्या लाभार्थ्यांच्या घरकुलाचा हप्ता टाकण्यात असेल अशा सर्व कामामध्ये देवणी नगर पंचायतचे नियुक्तीस असलेले तत्कालीन नगर अभियंता सुमित देबडवार यांच्या विरोधात देवणी येथील विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी अनेक वेळा तक्रारी देऊन उपोषण हि केले आहे.

या तक्रारीची दखल घेऊन अनेक कामांची चौकशी सुद्धा झाली नगर पंचायतचा नगर अभियंता हे पद नगर पंचायत अंतर्गत होणाऱ्या सर्व कामाचे गुणवत्ता पाहणे, दर्जेदार विकास कामे करून घेणे हि जवाबदारी नगर अभियंत्याची असते मागील सत्ता काळात झालेल्या अनेक विकास कामांच्या तक्रारीवरुण व विकासकामे दर्जेदार केले नसल्यामुळे नगरअभियंता सुमित देबडवार यांची येथुन बदली करण्यात आली होती. त्याचे कारण असे होते कि, देबडवार यांच्या कार्यकाळात झालेल्या कामाचे ज्या तक्रारी प्राप्त झाल्या त्या तक्रारी नुसार त्या कामाची गुणवत्ता राखण्यास नगर अभियंता देबडवार हे अपयशी झाल्यामुळे त्यांची देवणी नगर पंचायत मधून बदली करण्यात आली होती, त्याच वादग्रस्त नगर अभियंता सुमित देबडवार यांची नियुक्ती कशी काय झाली यांच्या कार्यकाळात देवणी बस स्टँड समोरील रोडची जवाबदारी या अभियंत्याकडे होती हेच्या चुकिमुळे रस्ता उकरुण दुबार करावे लागले होते. त्यामुळे नागरीकांना व वाहतुकिस अडचण निर्माण झाल्यामुळे अनेक दिवस नागरीकास नाहक त्रास सहन करावे लागले. यामुळेच बस स्थानकामधुन बस येण्या जाण्या करीता बस स्थानकाचा कंपाउंड फोडुन बसेस साठी रस्ता करावा लागला नगर अभियंता परत देवणीला आल्यामुळे याबाबत देवणी शहरातील नागरीकातुन व राजकीय पक्षात चर्चा होत असून सुजान नागरीकांत नाराजी होत आहे. याकडे आता आयुक्त साहेब औरंगाबाद तसेच जिल्हाधिकारी साहेब लातुर यांनी याकडे लक्ष देऊन वादग्रस्त नगर अभियंत्यास ताबडतोब कार्यमुक्त (बदली) करण्यात यावे अशी मागणी सुजान नागरीकातुन केली जात आहे.

## शिक्षण संस्था महामंडळाचे परीक्षांवर बहिष्कार घालण्याचे आंदोलन स्थगित

**लातूर/प्रतिनिधी**

वेतनेत्तर अनुदान व इतर न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत दहावी व बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने केलेले आंदोलन विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता गुरुवारी स्थगित करण्यात आले आहे. सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी वर्ग खोल्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे अध्यक्ष विजय नवल - पाटील यांनी बुधवारी खासदार शरद पवार यांची भेट घेतली. तसेच गुरुवारी त्यांनी ऑनलाईन बैठक घेतली. खा. पवार यांनी माध्यमिक, प्राथमिक व कनिष्ठ महाविद्यालय वेतनेत्तर अनुदान व इतर सर्व मागण्या मार्गी लावू, असे आश्र्वासन दिले. त्यामुळे महामंडळाने आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे संस्थाचालक संघटनेचे विभागीय अध्यक्ष रामदास पवार यांनी कळविले आहे. परंतु, शासनाने १४ तारखेच्या आत जर बैठक घेऊन आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर दहावीच्या व बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार टाकण्यात येईल, असेही पवार यांनी म्हटले आहे. या प्रसंगी विभागीय सचिव बाबूराव जाधव, विभागीय कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्रा. गोविंद घार, जब्बार सगरे, ओमप्रकाश साकोळकर, मुख्याध्यापक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख, पंडितराव धुमाळ संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## लातूर एनसीआयबीचे अधिकारी शिरीषकुमार शेरखाने यांचा सन्मान



**पुणे/प्रतिनिधी**

पुणे येथे एनसीआयबीच्या राज्यस्तरीय ट्रेनिंग कॅम्पमध्ये लातूरचे अधिकारी शिरीषकुमार शेरखाने यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे डायरेक्टर चंदशेखर धोत्रे यांच्या हस्ते शेरखाने यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जॉईंट डायरेक्टर फिरोजअली, अल्ताफ अन्सारी, ऍडिशनल डारेक्टर गणेश नावाडे, विनोद मणियार आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

## पशु संजीवनी अभियानास ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी साहाय्य करावे -दिलीप स्वामी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

शेती बरोबरच शेतकऱ्यांकडील पशुधन हा देखील ग्रामीण जिवनाचा महत्वाचा घटक आहे. पशुधन म्हणजे शेतकऱ्यांच्या अर्थ व्यवस्थेचा कणा आहे. या पशुधनाचे आरोग्य व्यवस्थित रहावे व पशुधन उत्पादनात गुणात्मक सुधारणेसाठी पशुसंवर्धन दवाखान्यांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी पशुसंजिवनी अभियान सुरु केले आहे.



जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये फिरत असताना जनावरांच्या अवस्था फारच वाईट आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या निदर्शनास आले. दवाखाने माणसांचे असोत वा जनावरांचे ते स्वच्छच हवेत या भावनेतून कृषी सभापती अनिल मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांच्याशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा करून पशुसंजीवनी अभियानाची रूपरेषा ठरविली. आपल्या गावातील पशुसंवर्धन दवाखाना एक आदर्श दवाखाना असावा व तो सक्षम असावा याची जबाबदारी त्या दवाखान्यात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांबरोबरच समस्त ग्रामस्थांची देखील आहे. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन दवाखान्यांचे सक्षमीकरण झाले तर जिल्हा दुग्ध व्यवसायात स्वयंपूर्ण होईल. निधीची कमतरता असल्याने लोकसहभागातून कामे करून घेणे आवश्यक आहे. तेंव्हा आपल्या गावातील पशुसंवर्धन दवाखान्यासाठी व आपल्या पशुधनासाठी गावातील दानशूर नागरीकांनी लोकसहभागातून मदत करावी. हा लोकसहभाग वस्तू रूपाने, श्रमदान रुपाने अथवा आर्थिक स्वरूपात करायचा आहे. या पुर्वी सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी स्वच्छ शाळा सुंदर शाळा या अभियानात लाखों रुपयांचा लोकसहभाग गोळा करून एक आदर्श निर्माण केला आहे. याही अभियानात नागरिकांनी आपला लोकसहभाग द्यावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व सभापती कृषी व पशुसंवर्धन अनिल मोटे यांनी केले आहे.

## निलंग्याचे माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**निलंगा/प्रतिनिधी**

मागील काळात सत्तेच्या बळावर निलंगा पालिकेसह लातूर महानगरपालिकेत संभाजी पाटील यांनी विजय प्राप्त केलेला होता. त्यावेळी त्यांच्या पाठीमागे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे बळ होते. मात्र काळाच्या ओघात त्यांना आता आमच्यासारख्या कार्यकर्त्यांची गरज राहिलेली नाही. त्यामुळेच आम्ही पुन्हा एकदा आमच्या स्वगृही म्हणजेच काँग्रेसमध्ये परतलेलो आहे. आगामी काळात होणार्या सर्व निवडणूकांमध्ये भाजपाचा पराभव करणे हेच आमचे ध्येय असून संभाजी पाटलांना त्यांची जागा दाखवून देत त्यांना निलंग्यातूनच काय लातूर मधून हद्दपार करू असा इशारा माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांनी दिला आहे.

मुंबई येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख, दुग्ध विकासमंत्री सुनिल केदार, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत निलंग्याचे माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना हमीद शेख म्हणाले की, आम्ही पुर्वीपासूनच काँग्रेस समर्थक होतो. मात्र मधल्या काळात भरकटल्यामुळेच भाजपामध्ये सक्रिय झाले होतो. या काळात जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संभाजी पाटील निलंगेकर यांनी जबाबदारी पाहिली होती. त्यावेळी राज्यात असलेल्या सत्तेच्या बळावरच संभाजी पाटील निलंगेकर यांनी निलंगा पालिकेसह लातूर महानगरपालिकेत विजय प्राप्त केला होता. त्याचबरोबर त्यावेळी निलंगेकर यांच्या पाठिशी आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचीही ताकद उभी केली होती असे हमीद शेख यांनी स्पष्ट केले. त्यामुळेच त्यांना हा विजय प्राप्त करता आला होता. मात्र आता आम्ही आमच्या समर्थकांसह पुन्हा एकदा आमच्या स्वगृही म्हणजेच काँग्रेसमध्ये परतलो आहोत हे संभाजी पाटील यांनी लक्षात ठेवावे असे हमीद शेख यांनी सांगितले.आगामी काळात निलंगा पालिकेसह लातूर महापालिकेच्या निवडणूकीत जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख व प्रदेश सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर यांनी आम्हाला सर्वतोपरी ताकद देण्याचा शब्द दिला आहे. नेत्यांनी दिलेली ताकद आणि काँग्रेसचे असलेले बळ या माध्यमातून संभाजी पाटील यांना निवडणूकीत सळो की पळो करून निलंग्यासह लातूर मधून सुद्धा त्यांना हद्दपार करू असा इशारा माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांनी दिलेला आहे.

## ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नये, याबाबत विधिमंडळात सोमवारी विधेयक मांडणार -उपमुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी**



इतर मागासवर्ग (ओबीसी) आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ नयेत ही शासनाची भूमिका असून ओबीसी समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मध्यप्रदेश सरकारने आणलेल्या विधेयकाप्रमाणे राज्य शासन सोमवारी विधिमंडळात विधेयक मांडणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. विधान परिषदेत ओबीसी आरक्षण प्रश्नावर नियम २८९ अन्वये चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. सभागृहातील सर्वच सदस्य ओबीसी आरक्षणाच्या बाजूने असून निवडणुका कधी घ्यायच्या याचा अधिकार निवडणूक आयोगाला असून या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होऊ नयेत यासाठी मध्यप्रदेश सरकारने आणलेल्या विधेयकाप्रमाणे विधेयक सोमवारी विधिमंडळात मांडण्यात येणार आहे. या विधेयकाला सर्वांनी एकमताने पाठिंबा द्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करून राज्य शासनावर कोणाचा कसलाही दबाव नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पालघर जिल्ह्यातील प्रलंबित पाणीपुरवठा योजना लवकरच पुर्ण होणार - पालकमंत्री दादाजी भुसे

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील विविध पाणी पुरवठा योजना संदर्भात आढावा घेण्यात आला असून जिल्ह्यातील प्रलंबित पाणीपुरवठा योजना पुर्ण करण्याची कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या दालनात पालघर जिल्ह्यातील पाणीपुरवठा बाबत बैठक पार पडली. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे बोलत होते. बैठकीत पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत पाणी पुरवठ्याची कामे लवकरच पुर्णत्वास नेण्याबाबत पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मागणी केली. जिल्ह्यातील खालील पाणी पुरवठा योजनांबाबत बैठकीत चर्चा झाली.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत वाढीव मनोर पाणी पुरवठा योजना ता.जि.पालघर हे काम माहे एप्रिल अखेर पुर्ण होईल असे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत बडा पोखरण व २९ गावे प्रादेशिक ग्रामीण पुरवठा योजना, ता. डहाणू व पालघरचे काम माहे मे अखेर पुर्ण करावे असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. पाटील यांनी वरिष्ठ अधिकारी यांना दिले. वसई-विरार उपप्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंतर्गत महानगरपालीकेतील ५२ व ग्रामीण १७ गावे असे एकुण ६९ गावांचा टप्पा-२, भाग-२ ता.वसई जि.पालघर हा प्रकल्प मार्च अखेर निविदा प्रक्रिया होऊन पुढील दोन वर्षात काम पुर्णत्वास येणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत प्रलंबित पाणी पुरवठा योजनाबाबत बैठकीत झालेल्या निर्णयामुळे प्रकल्प लवकर पुर्ण होऊन पालघरवासीयांचा पाणी प्रश्न मार्गी लागणार असल्याचे कृषि, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

## पालघर जिल्ह्यात ८९ टक्के पोलिओ लसीकरण पूर्ण -डॉ.माणिक गुरसळ



**पालघर/प्रतिनिधी**

२७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत पालघर जिल्ह्यात लक्षणीय काम झाले पालघर जिल्हयात ८९ टक्के लसीकरण पूर्ण झाले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी सांगितले. जिल्ह्यातील तालुका निहाय झालेले काम : डहाणू लक्षांक ३८७२६ झालेले काम ३२९६६ टक्के ८५, पालघर लक्षांक ४८२९५ झालेले काम ४४३१६ टक्के ९२, वसई लक्षांक १८३७१ झालेले काम १६८३८ टक्के ९२, तलासरी लक्षांक १७७६२ झालेले काम १६५१० टक्के ९३,वाडा लक्षांक १८३६२ झालेले काम १६१४३ टक्के ८८, विक्रमगड लक्षांक १४८७४ झालेले काम १३१६५ टक्के ८९, जव्हार लक्षांक १३७२२ झालेले काम ११९६५ टक्के ८७, मोखाडा लक्षांक ८८६१ झालेले काम ६७७० टक्के ७६, एकूण पालघर जिल्हा लक्षांक १७८९७३ झालेले काम १५८६७३ टक्के ८९, एकूण बूथ २१९२मोबाईल टिम ९६, ट्रान्झिट टिम ५८ एकूण कर्मचारी संख्या ५२७६ यांनी मोहिम यशस्वी केली.

## युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा

**लातूर/प्रतिनिधी**

सद्यस्थितीत रशिया व युक्रेन या देशांमध्ये युध्दजन्य परिस्थिती निर्माण झालेली असून युक्रेन या देशात भारतीय नागरीक व विद्यार्थी अडकल्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. अशा नागरीकांच्या मदतीसाठी पूढील प्रमाणे हेल्पलाईन्स नवी दिल्ली येथे स्थापन करण्यात आलेल्या आहेत. केद्रीय रराष्ट्रमंत्री कार्यालय, नवी दिल्ली, फोन - टोल फ्री १८००११८७९७ फोन- ०११-२३०१२११३/ २३०१४१०५/ २३०१७९०५, फक्स- ०११-२३०८८१२४, ई-मेल- situationroommea.gov.in असा आहे.जर औरंगाबाद विभागातील कोणतेही नागरिक किंवा विद्यार्थी युक्रेन या देशात अडकले असल्यास पूढील प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियंत्रण कक्षास संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. जिल्हा, जिल्हा नियंत्रण कक्ष दुरध्वनी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नाव व दुरध्वनी क्रमांक पूढील प्रमाणे आहे.

औरंगाबाद -०२४०-२३३१०७७, श्री.अजय चौधरी ९९७०९७७४५२, जालना- ०२४८२-२२३१३२, श्री. दिपक काजळकर-९४०३७६२००५, परभणी-०२४५२-२२६४००,श्री.पवन खांडके- ९९७५०१३७२६, हिंगोली- ९५५२९३२९८१, श्री.रोहित कंजे - ९५२७०४४१७१, नांदेड- ०२४६२-२३५०७७, श्री.किशोर कुर्हे-९४२२८७५८०८, बीड- ०२४४२-२२२६०४, श्री.जोशी- ९४२१३४५१६५, लातूर- ०२३८२-२२०२०४/ २२३००२, श्री.साकेब उस्मानिया- ९१७५४०५२२७, उस्मानाबाद- ०२४७२-२२५६१८, श्री.वृषाली तेलोरे-९६६५०३१७४४, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद नियंत्रण कक्ष दुरध्वनी - ०२४०-२३४३१६४ असा आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### शारदा स्कूलमध्ये विज्ञान दिवस साजरा

लातूरः येथील शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे समन्वयक एल. एम. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे श्रीकांत पाटील उपस्थित होते. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ.एम.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेवर आधारित लघुनाटिका सादर केली. यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान प्रकल्पाचे प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमास पालकांची उपस्थिती होती. शाळेचे प्राचार्य कैलास जाधव, समन्वयक विलास गायकवाड, वैशाली गिरवलकर, शीला शेळके उपस्थित होते. परीक्षा विभाग प्रमुख रहमत सय्यद व विज्ञान विभाग प्रमुख सागर घालमे, विज्ञान शिक्षक सायली मेनकुदळे, मंजुश्री सासवडे, नाजनीन उस्मानी, अझहर पटेल, स्मिता पाटील व सर्व शिक्षक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रकल्प प्रदर्शन व लघुनाटिका सादर केली.

### आज ऑनलाईन जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : माहे मार्च -२०२२ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ०७/०३/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली Google Meetव्दारे आयोजित करण्यात येणार आहे. तरी https://meet.google.com/phb-wmkv-bzw ही त्रेसश्रश चशशीं ची लिंक असून सदर लिंकचा वापर करून लोकशाही दिनास आवश्यक त्या माहितीसह वरील दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

### संत ककय्या महाराज जयंती साजरी

लातूर : लातूर येथे ककय्या समाजाचे संत ककय्या महाराज यांच्या जयंती साजरी करण्यात आली. निमित्ताने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समजाचे अध्यक्ष ऍड. जांबुवंतराव सोनकवडे, श्रीमंत कावळे, कौशल्या सोनकवडे, गणेश सावळकर, दिगंबर खरटमोल, शंकरराव इंगळे, प्रभाकरराव कोकणे, अप्पाराव कावळे, बालाजी कावळे, प्रा.डॉ. महाविर कटके, विवेकानंद सोनकवडे, विजयकुमार रसाळ हे उपस्थित होते.

### कंपनी सेक्रेटरी परीक्षेत यश

लातूर : लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजराव दामावले यांचे सुपूत्र आकाश दामावले यांनी नुकत्याच झालेल्या कंपनी सेक्रेटरी परिक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. श्री केशवराज विद्यालयात शालेय शिक्षण झालेल्या आकाशने दयानंद वाणिज्य महाविद्यालयातून बी.कॉम. पदवी घेतली असून पुणेच्या मराठवाडा मित्र मंडळ शिक्षण संस्थेतून एम.कॉम.केले आहे.आणि डिसेंबर २०२१ मध्ये झालेल्या कंपनी सेक्रेटरी (सी.एस.) परीक्षा दिली होती,त्याचा नुकताच निकाल जाहीर झाला असून,त्यात आकाशने उज्वल यश संपादन केले आहे.त्याच्या या खडतर यशाबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा शिवसेना जिल्हा व्यापारी आघाडी सल्लागार सी.के.मुरळीकर यांच्या हस्ते शाल,पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रा.दिपक पौळ, शिवाजी दामावले, सुनील ढवळे, तसेच दामावले परिवारातील सदस्य उपस्थित होते.

### लातूरमध्ये महाशिवरात्री पर्व उत्साहात!

लातूर : प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही लातूर येथील महाकाल प्रतिष्ठानच्या वतीने महाशिवरात्री पर्व अत्यंत भक्तिमय-उत्साही वातावरणात संपन्न झाले. यावर्षी या सोहळ्यास हजारोंच्या संख्येने शिवभक्तांची उपस्थिती होती. महाकाल प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षी महाशिवरात्री उत्सव अत्यंत भक्तिभावाने साजरा केला जातो. मागच्या वर्षी कोरोना संक्रमणाच्या पार्श्र्वभूमीवर इच्छा असूनही प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी हा उत्सव साधेपणाने साजरा केला होता. मात्र महाकाल भगवानची पूजा अर्चना मात्र तेवढ्याच भक्तिभावाने आणि तन्मयतेने केली होती. यावर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधून श्री महाकाल देवतेचा भव्य पालखी सोहळा व शोभायात्रा हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत काढण्यात आली. ही शोभायात्रा भक्तीगीत गायन, डमरू - झांज वादन, ढोल - संबळ-शृंगी वादन, ध्वजा नृत्य आदी शिस्तबद्ध प्रदर्शनाने काढण्यात आली. ही शोभायात्रा शहरातील पापविनाश मंदिर पासून काढण्यात आली. पापविनाश मंदिर, पोचम्मा गल्ली मार्गे औसा हनुमान मंदिर, महात्मा गांधी चौक, हनुमान चौक, सुभाष चौक, खडक हनुमान मार्गे ती परत पापविनाश मंदिर येथे विसर्जित करण्यात आली. त्याठिकाणी महाआरतीने या उपक्रमाची उत्साहात सांगता झाली. यावर्षीच्या या सोहळ्यास .या वेळी महाकाल प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी सदस्य, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, खा. सुधाकर शृंगारे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शैलेश लाहोटी, परिसरातील नागरिक, शहरातील मान्यवर, युवक, महिला, सदस्य आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरावेत

लातूर : जिल्हयातील सर्व शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविदयालयाचे प्राचार्य व या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती , विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विदयार्थी यांनी सन २०२१-२२ या वर्षासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी हे पोर्टल दि. १४ डिसेंबर २०२१ पासून सुरु करण्यात आलेले आहेत, असे सहायक आयुक्त, समाज कल्याण लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. जिल्ह्यातील सर्व प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती चे अर्ज अचूक भरुन मंजूरीसाठी या कार्यालयास पूढील प्रमाणे अंतिम मुदत देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ च्या नविन व नुतनीकरण अर्ज ऑनलाईन सादर करण्याची दिनांक ०७ मार्च २०२२ पर्यंत अंतिम मुदत, केवळ अनुसूचित जमाती प्रवर्ग, शैक्षणिक सन २०२१-२२ च्या नविन व नुतनीकरण अर्ज ऑनलाईन सादर करण्याची दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत अंतिम मुदत केवळ विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्ग, शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ च्या अर्ज रिअप्लाय ऑनलाईन सादर करण्याची दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत अंतिम मुदत आहे.

07 TO 13 MARCH 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:53 PM Page 1



# मुजोर एसटी कामगार आणि नामर्द सरकार!

जगात पोलादी पुरुष अशी ओळख असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात सध्या नामर्द आणि डरपोक लोकांचे सरकार आहे. त्यामुळे अशा लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा अधिकार नाही. सध्या एसटी कामगारांचा जो बेकायदेशीर संप सुरू आहे त्या संपकऱ्यांच्या समोर सरकार वारंवार गुडघे टेकून आम्ही लाचार आहोत, तुमच्या पाया पडतो... तुम्ही काहीही करा, आम्ही तुमच्यावर कोणतीही कारवाई करणार नाही असे सरकार एसटी कामगारांना सांगतेय. त्यामुळे संपकरी एसटी कामगारांची मुजोरी वाढली आहे. ते न्यायालयाला सुद्धा जुमानायला तयार नाही. त्यांच्या विलीनीकरण करण्याची मागणी कुठल्याही दृष्टीने योग्य नव्हती. त्यामुळे औद्योगिक न्यायालयाने यापूर्वीच हा संप बेकायदेशीर ठरवला आहे. तर विलिनीकरणाच्या मुद्यावर विचार करण्यासाठी नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने विलीनीकरण करण्यास नकार दिला आहे. तरीही परिवहन मंत्री निर्लज्ज आणि लाचार बनून एसटी कामगारांच्या पाया पडत आहेत. या सारखे दुर्दैव नाही. सत्तेसाठी एवढी लाचारी यापूर्वी कधीही महाराष्ट्राने पाहिली नव्हती. परिवहन मंत्र्यांनी या संप काळात ग्रामीण भागात जाऊन तिथल्या जनतेचे किती हाल सुरू आहेत ते बघावेत. आज शाळा सुरू झाल्यात, ग्रामीण भागातील बरीचशी मुले तालुक्याच्या ठिकाणी किंवा दुसऱ्या गावात जिथे शाळा असेल तिथे शिकायला जातात. त्यांच्यासाठी एसटी हेच प्रवासाचे एकमेव साधन आहे. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांचे हाल सुरू आहेत. ही मुलं रस्त्यात उभी राहून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना हात दाखवतात. पण त्यांना कुणी शाळेपर्यंत लिफ्ट द्यायला तयार नाहीत. त्यामुळे त्या मुलांवर पाच-पाच मैल चालत जाण्याची पाळी येते. त्यातच आता दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू झाल्यात. या मुलांनी काय करायचं परिवहन मंत्र्यांचे डोळे फुटले आहेत का? ९२ हजार एसटी कामगारांसाठी ४ कोटी प्रवाशांचे सरकार हाल करीत आहे. विरोधी पक्षाला सुद्धा एसटी कामगारांचा पुळका आलाय. एरव्ही सगळ्या गोष्टी कायद्याने व्हायला हव्यात असा आग्रह धरणाऱ्या विरोधी पक्षाने एसटी कामगारांचा संप कायदेशीर आहे का हे सांगावे, म्हणजे लोकांचे हाल झाले तरी चालतील पण एसटी कामगारांची मते आम्हालाच मिळायला हवीत. यासाठी सत्ताधारी आणि विरोधी बाकावर बसलेले भाजपवाले एसटी कामगारांचे तारणहार बनत आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. आता विलिनीकरणाचा मुद्दा निकाली निघाला आहे. उद्या ११ तारखेला न्यायालय सुद्धा वेगळा काही निकाल देईल असे वाटत नाही. त्यामुळे आता तरी साम-दाम-दंड या नितीने एसटी कामगारांचा संप चिरडून टाका ज्यांना निलंबित किंवा बडतर्फ केले आहे त्यांना कोणत्याही परिस्थितीत कामावर घेऊ नका, अन्यथा प्रवासी जर रस्त्यावर उतरले तर सरकार विरोधी पक्ष आणि संपकरी कामगार यांचे काय होईल याची कल्पनाही करता येणार नाही. एक गोष्ट निश्चितपणे समजली की हे सरकार कमजोर आहे. त्यामुळे अशा कमजोर सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही, पण त्याच बरोबर आपल्या स्वार्थी राजकारणासाठी चार कोटी एसटी प्रवाशांकडे दुर्लक्ष करणारा विरोधी पक्ष सुद्धा सत्तेत येण्याच्या लायकीचा नाही. विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्ष नवाब मलिक यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करतोय, पण चार कोटी प्रवाशांची गेल्या तीन महिन्यांपासून हाल सुरू आहेत त्यांच्या विषयी काही बोलायची किंवा सरकारला जाब विचारायचा विरोधी पक्षाला आवश्यकता वाटत नाही. लोकशाहीमध्ये सरकारपेक्षा विरोधी पक्षाची भूमिका आणि जबाबदारी मोठी असते, पण कुठल्या प्रश्नाला महत्व द्यायचं याची जर विरोधी पक्षाला अक्कल नसेल तर ते सरकारवर काय अंकुश ठेवणार आहेत. नवाब मलिक या एका माणसासाठी जे लोक आंदोलन करतात आणि चार कोटी एसटी प्रवाशांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवतात त्यांना काय म्हणायचे? वास्तविक सदाभाऊ आणि पडळकर यांनी एसटी कामगारांच्या लढ्यात संनपकऱ्यांना पाठिंबा देऊनही हटवादी संपकऱ्यांनी त्यांच्यावर टांगवर करून एका मनोरुग्णाच्या नादी लागलेत त्यावरून तरी भाजपवाल्यांना कळायला हवे होते की संपकऱ्यांचे सुद्धा मानसिक स्वास्थ बिघडले ते आता कोणाचेही ऐकणार नाही, तेंव्हा आता तरी प्रवाशांची बाजू घ्यावी. पण संपकऱ्यांनी भाजपवाल्यांच्या पार्श्वभागावर लाथा घातल्या तरीही त अजून त्यांचीच बाजू घेत आहेत. मग अशा विरोधी पक्षाकडून काय अपेक्षा ठेवायची? त्यामुळे सरकार, विरोधी पक्ष आणि न्यायपालिका यांच्याकडून आता कसलीच अपेक्षा नसल्याने या संपकऱ्यांचा इलाज करण्यासाठी आता प्रवाशांनाच काहीतरी करावे लागेल असे प्रवाशांचे म्हणणे आहे. तो मनोरुग्ण सदावर्ते सांगतोय हा संप नाही दुखवटा आहे. दुखवटा पाळायला त्याचा बाप मेलाय का? आणि त्याचा बाप मेला तर एसटी कामगारांनी दुखवटा का पाळावा? कुठल्याही विकृत माणसासमोर जर सरकार झुकायला लागले आणि विरोधी पक्ष अशा संकटाच्या काळात सुद्धा लोकांची साथ सोडून राजकारण करायला लागले, तर त्यांनाही लोकांनी निवडणुकीत अद्दल घडवायची हवी.

# रशिया-युक्रेन संघर्षाचा गुंता



**(युद्धातून युद्धच जन्माला येतात, शाश्वत मार्ग निघत नाही. आजच्या युद्धातच भविष्यातील युद्धाची बीजं रोवली जातात. प्रत्यक्षात तिसरं महायुद्ध होईल की नाही, हे निश्चित सांगता येत नाही, कारण ते संयम आणि विवेकाच्या भरोशावर विसंबून आहे! मात्र त्याच्या आगमनाचा इशारा देणाऱ्या रशिया-युक्रेन संघर्षाला अशीच ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.)**

## दिशायन

रशिया आणि युक्रेन या राष्ट्रांमध्ये युद्ध सुरू आहे. या संघर्षामुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे अशी शक्यता अनेक तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. ह संघर्ष केवळ दोन राष्ट्रांपुरता मर्यादीत नसून याचा संबंध अनेक देशांशी जोडला गेलाय तर याचा परिणाम अनेक लहान - मोठ्या देशांवर होत आहे. जगाने देशांदेशांमधील संघर्ष पाहिलेले आहेत, अनुभवलेले आहेत. जसे की पहिलं महायुद्ध, दुसरं महायुद्ध, शीतयुद्ध आणि सध्या सुरू असलेला युक्रेन-रशिया संघर्ष. जागतिक राजकारणात नेहमीच चढउतार होत असतात. पण यात मोठ्या राष्ट्रांच्या भूमिका नेहमीच महत्त्वाच्या राहिल्या आहेत, कारण मोठी राष्ट्रं जागतिक राजकारणाला आपल्या हिताच्या दृष्टीनं दिशा देण्याचं काम करतात. आपलं हित जपण्यासाठी, सामर्थ्य, प्रभाव वाढवण्यासाठी नैतिक-अनैतिक अशा दोन्ही मार्गाचा अवलंब करतात. त्यांचं हित धोक्यात आलं की, संघर्ष होतो.

१९१७मध्ये रशियन बोल्शेव्हिक क्रांती झाली आणि अनेक वेगवेगळ्या प्रदेशांना एकत्र करून साम्यवादी सोव्हिएत युनियन' राष्ट्र म्हणून जगाच्या पटलावर आले. रशियानंतरचा सर्वात मोठा भूप्रदेश असलेला युक्रेन नाईलाजानेच १९२२मध्ये युनियनचा सदस्य बनला. त्याला सांस्कृतिक वर्चस्ववादाची किनार आहे. रशियन लोक युक्रेनियन लोकांना होहोल' या नावानं ओळखतात. त्याचा अर्थ 'Not Smart, Not good' असा होतो. म्हणजे रशियन लोक युक्रेनियन लोकांना ना सामावून घेतात, ना युक्रेनियन रशियाच्या वर्चस्ववादाचा स्वीकार करतात. म्हणजे युक्रेनने केवळ आपल्या सीमा संलग्न करत सोव्हिएत युनियनचं सदस्यत्व स्वीकारलं. आम्ही वेगळे आहोत, ही भावना नेहमीच त्यांच्यात होती, हे खरं.

पुढे १९४५मध्ये अमेरिकने जपानवर केलेल्या अण्वस्त्र वापरानंतर आपलं जागतिक प्रभुत्व कमी होईल, या भीतीनं सोव्हिएत युनियननेही १९४९मध्ये अणुचाचणी केली. आणि अमेरिका-सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्धाला सुरुवात झाली. विचारसरणी, अर्थव्यवस्था आणि भौगोलिकदृष्ट्या युरोपची आणि एकंदरीत जगाची दोन गटांत विभागणी झाली. म्हणजे अमेरिकेच्या नेतृत्वाखालचा भांडवलशाही गट (पश्चिम युरोप) आणि सोव्हिएत युनियनच्या नेतृत्वाखालचा साम्यवादी गट (पूर्व युरोप). या दोन्ही गटांमध्ये एकमेकांबाबत टोकाचा अविश्वास, तीव्र संशय, भीती, असुरक्षितता होती. त्यातून अनेक वेळा युद्धाचा धोकाही उद्भवला. एकमेकांबाबत असलेल्या या असुरक्षिततेच्या भीतीतून सोव्हिएत युनियनला रोखण्यासाठी अमेरिकेने आपल्या १२ मित्रराष्ट्रांना सोबत घेऊन उत्तर अटलांटिक ट्रिटी करार' (छढज, १९४९) या लष्करी गटाची निर्मिती केली. ज्याचा मुख्य उद्देश सोव्हिएत युनियनला विरोध करणं आणि आपल्यावर कोणी आक्रमण केलं, तर सामूहिकरीत्या त्याचा प्रतिकार करणं हा होता. या लष्करी गटाचा अनेक वेळा सोव्हिएत रशियाविरोधात वापर करण्याचा प्रयत्नही केला गेला (उदा. क्युबा प्रेचप्रसंगावेळी).

नाटोनंतर सोव्हिएत युनियनेही व्हार्सा करार करून लष्करी गटाची निर्मिती केली. अमेरिका-सोव्हिएत युनियन या दोन्ही महासत्तांना इतर राष्ट्रांना आपल्या नियंत्रणाखाली व प्रभावाखाली बांधून ठेवायचं होतं, आजही आहे. तो त्यांचा कधीही न बदलणारा स्वभाव गुणधर्म आहे. जर इतर राष्ट्रांवरील आपला ताबा सुटला, तर आपल्या जागतिक अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती त्यांना होती, आहे. नंतरच्या काळात हळूहळू सोव्हिएत रशियामध्ये अनेक धोरणात्मक बदल झाले. १९५३मध्ये जोसेफ स्टॅलिनच्या मृत्यूनंतर निकिता क्रुश्चेव्ह सत्तेवर आले. त्यांनी सोव्हिएत रशियाच्या धोरणात बदल घडवून आणले, अमेरिकेसोबत शांततामय 'सहजीवना'च्या धोरणाची संकल्पना मांडली, पण ती अपयशी ठरली. १९५९ साली कॅम्प डेव्हिड बैठक झाली. तणाव कमी करण्यासाठी हॉटलाईन यंत्रणा उभी केली, मॉस्को परिषद (१९७२) पर्वाची सुरुवात करण्यात आली. पण खरा बदल झाला तो १९८५ नंतर मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी 'पेरेस्त्रोईका' व 'ग्लासनोस्त' या संकल्पना स्वीकारून सोव्हिएत रशियाच्या पूर्वाश्रमीच्या धोरणाला तडा दिला. त्यामुळे त्यांना राजीनामाही द्यावा लागला. सोव्हिएत प्रभावाखालील पूर्व युरोपियन राष्ट्रांमध्येही जनआंदोलन झालं. साम्यवादी सरकारं उलटली, सोव्हिएतचा प्रभाव कमी झाला. सुप्रीम सोव्हिएत (संसद)ने ठराव पास करून सोव्हिएत युनियन संपवलं. परिणामी शीतयुद्ध तेवढ्यापुरतं तरी संपलं.

सोव्हिएत युनियनचं विघटन झालं आणि १५ नवीन देशांची निर्मिती झाली. यापैकीच रशिया आणि युक्रेन ही दोन राष्ट्रं. पण रशियाला या १५ देशांचं नेतृत्व करायचंय, आपल्या प्रभावाखाली ठेवायचंय. या राष्ट्रांनी आपल्याला युनियनचा वारसदार मानावा, अशी रशियाची भूमिका आहे. त्यासाठी रशिया त्यांना अमेरिका व युरोपियन राष्ट्रांशी, एकंदरीत नाटो गटांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण त्यात त्याला पुरेसं यश मिळालेलं नाही. सोव्हिएत युनियनमधून बाहेर पडलेल्या बऱ्याच देशांनी नाटोचं सदस्यत्व स्वीकारलं. आणि आज याचमुळे रशिया-युक्रेन युद्ध सुरू झालं आहे. सोव्हियत युनियनमधून बाहेर पडल्यानंतर युक्रेनने नाटोचं सदस्यत्व मिळवण्याचा आणि युरोपियन राष्ट्रांशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न सुरू केला. युक्रेनमध्ये होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत नाटो सदस्यत्व प्राप्त करणं आणि रशियाचं प्रभुत्व संपवणं, हे दोन प्रमुख मुद्दे असतात. युक्रेनचे पहिले अध्यक्ष लियोनिद क्रावचुक यांनी १९९१मध्ये रशियापासून आझादी'ची घोषणा केली होती. असं जरी असलं तरी युक्रेनमध्ये आपल्या सोयीचा अध्यक्ष निवडून आणण्याचा रशिया नेहमीच प्रयत्न करतो. विक्टर यानूकोविच (२०१० व २०१४) हे रशियापुरस्कृत अध्यक्ष होते. त्यांनी अमेरिकेसोबत असलेला व्यापार संवाद संपवला होता आणि रशियासोबत व्यापारी संबंध प्रस्तापित केले होते. पण २०१४मध्ये रशियाने युक्रेनच्या नैसर्गिक वायूसंपन्न क्रिमियावर आक्रमण केलं व ताबा मिळवला. अधिकृतरित्या हा युक्रेनच्या भाग आहे, कारण कर्चची सामुद्रधुनी या प्रदेशाला रशियापासून वेगळी करते, पण तेथील बहुसंख्य लोक रशियन वंशाचे आहेत. त्यामुळे रशियाला क्रिमियावर ताबा मिळवण्यासाठी जास्त कष्ट घ्यावे पडले नाहीत.

या संघर्षात १५ हजार लोकांचा मृत्यू झाला होता. विक्टर यानूकोविच रशियात पळून गेले. या घटनेचे तीव्र पडसाद युक्रेनच्या राजकीय व व्यापारी धोरणावर पडले. पेट्रो पोरोशेनको हे नवीन अध्यक्ष सत्तेवर आले. त्यांनी युरोपियन युनियनसोबत व्यापारी करार केला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून पाच बिलियन डॉलर मिळवले. या घटना रशियाला चेतावणी देणाऱ्या होत्या. साहजिकच रशिया-युक्रेन संबंध जास्त चिघळले. २०१९मध्ये व्होदिमिर झेलेन्स्कि हे युक्रेनचे अध्यक्ष झाले. जानेवारी २०२१मध्ये यांनी अधिकृतपणे नाटोकडे सदस्यत्वाची मागणी केली. त्यामुळे रशिया-युक्रेन संघर्ष जास्त तीव्र झाला. युक्रेनने नाटोमध्ये जाणं रशियाला कधीही मान्य होणार नाही. युक्रेन जर नाटोमध्ये गेला तर आपोआप रशियाविरोधी राष्ट्र बनेल. त्याचे अनेक दुष्परिणाम रशियावर होऊ शकतात.

राजकीय, आर्थिक व भौगोलिकदृष्ट्या युक्रेन रशियासाठी महत्त्वपूर्ण आहे. रशिया हा युरोपियन राष्ट्रांना नैसर्गिक गॅसचा पुरवठा करणारा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. युरोपच्या एकूण मागणीच्या ४० टक्के नैसर्गिक गॅसचा पुरवठा एकटा रशिया करतो. त्यानंतर जर्मनी ४३ टक्के, फ्रान्स १६ टक्के आणि झेक प्रजासत्ताक, हंगेरी, स्लोव्हाकिया, पोलंड ५० टक्के. म्हणजे रशियाच्या अर्थव्यवस्थेला मजबूत बनवणाऱ्या या व्यापारावर युक्रेनचा प्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो. कारण युरोपियन राष्ट्रांकडे जाणाऱ्या यातील मुख्य गॅस पाइपलाइन युक्रेनमधून जातात. जर युक्रेन नाटोमध्ये गेला तर रशियाच्या अर्थव्यवस्थेला धोका पोहचू शकतो, अशी रशियाची धारणा आहे. २०१४मध्ये रशिया-युक्रेन संघर्षात यूक्रेनने या पाइपलाइन उदध्वस्त केल्या होत्या. भौगोलिकदृष्ट्या पूर्व युरोप आणि रशिया यांना जोडणारा भुप्रदेश म्हणजे युक्रेन. तो नाटोमध्ये गेला, तर रशियाच्या सीमालगत नाटो समुदाय येईल आणि ते त्याला नको आहे. त्यामुळे युक्रेनला नाटोचे सदस्यत्व मिळणार नाही, याचे रशियाला आश्वासन अमेरिकेकडून करार स्वरूपात पाहिजे, तरच युद्धाला पूर्णविराम मिळेल, अशी भूमिका रशियाने घेतली आहे. त्याचबरोबर युक्रेनच्या पूर्व भागात असलेल्या डॉनेत्स्क आणि लुहान्स्क या भागांना रशियाने स्वतंत्र देश म्हणून घोषित केले आहे. या प्रदेशात रशियन वंशाचे लोक जास्त आहेत. ते वेळोवेळी रशियाला मदत करतात. नैसर्गिक संसाधनांच्या दृष्टीनेही हा संपन्न प्रदेश आहे. हादेखील उभय देशांमधील कळीचा मुद्दा आहे. परिणामी रशियाने युक्रेनवर आक्रमण केलं आहे. रशिया-युक्रेन संघर्ष सुरू झाल्यापासून साऱ्या जगाचं लक्ष संयुक्त राष्ट्र संघ, अमेरिका, युरोपियन राष्ट्रं, भारत आणि चीन यांच्या भूमिकेकडे लागलं आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव अन्तोनियो गुटरस यांनी दोन्ही देशांना शांततेचं आवाहन करत युक्रेनला २० मिलियन डॉलर आपत्कालीन मदत देऊ केली आहे. पण युद्ध थांबवण्याची कोणतीही ठोस कृती युनोकडून झालेली नाही. युनोच्या जाहीरनाम्यातील कलम ३९-५१मध्ये असलेलं सामूहिक सुरक्षिततेचं तत्त्व निकामी ठरलं आहे. आणि जरी हा प्रस्ताव पुढे आणण्याचा प्रयत्न केला, तरी सुरक्षा परिषदेतील नकाराधिकारात तो अडकणार हे निश्चित. कारण सुरक्षा परिषदेत एकमतानं ठराव पास करावा लागतो आणि रशिया व चीन स्वतःविरुद्ध मत देणं अशक्य आहे. त्यामुळे सध्या तरी युनो बघ्याची भूमिका घेत आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी सुरुवातीला रशियाला चेतावणी देत आक्रमक भूमिका घेतली, युक्रेनला साथ दिली, पण प्रत्यक्ष युद्ध सुरू होताच २०१४मध्ये रशिया-युक्रेन संघर्षात ओबामा यांनी स्वीकारलेल्या भूमिकेचीच री ओढत असल्याचं दिसतं आहे. त्यांनी युक्रेन अध्यक्षांना देश सोडण्याचाही मार्ग सुचवला. युरोपियन राष्ट्रं अमेरिकेचेच मित्र आहेत. त्यामुळे त्यांनीही रशियावर व्यापार व बँकांवरील निर्बंधाशिवाय आणखी कोणती कृती हाती घेतलेली नाही. नाटो म्हणजेच अमेरिका आणि युरोपीय देश. त्यामुळे या राष्ट्रांची जी भूमिका आहे, तीच नाटोची. नाटोच्या महासचिव जेन्स स्टोल्सटनबर्ग यांनी युद्धात सैन्य उतरणार नसल्याचं जाहीर केलं. आणि दुसरी गोष्ट उक्रेन नाटोचा सदस्य नसल्यानेही काही मर्यादा येतात. याबाबत युक्रेनच्या अध्यक्षाने खंत व्यक्त केली आहे की, साऱ्या जगानं आम्हाला एकटं सोडलं आहे. रशियाचा मी एक नंबरचा टार्गेट आहे, तर माझा परिवार दोन नंबरचा, पण मी देश सोडणार नाही. एकंदरीत अमेरिका, युरोप, युनो यांनी युक्रेनचं समर्थन केल आहे, पण ठोस पाऊल उचललेलं नाही. चीन रशियाचा मित्रराष्ट्र. त्यामुळे त्याने रशियाच्या आक्रमकतेचा विरोध केला नाही, पण स्पष्टपणे समर्थनही केलं नाही. दोन्ही देशांना चर्चेचं आवाहन केलं आहे. चीनचा हस्तक असलेल्या पाकिस्तानची भूमिकाही तीच आहे. आणि सध्या इम्रान खानही रशियामध्ये आहेत. दोन्ही देशाच्या भूमिका स्पष्ट नसल्या तरी ते रशियाचे समर्थक आहेत. या संघर्षात भारताची भूमिका खूप महत्त्वाची आहे. युक्रेनच्या परराष्ट्र मंत्रालयानं भारताची मदत मागितली, परंतु भारतानं ना रशियाची निंदा केली, ना युक्रेनची पाठराखण. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुतिन यांच्याशी फोनवरून केलेल्या संभाषणात युद्ध थांबवण्याबाबत चर्चा केली आहे. पण युद्धाची तीव्रता अशीच वाढत राहिली, तर भारताला तटस्थ राहणं कठीण जाईल. भारत सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य आहे आणि सुरक्षा परिषदेमध्ये होणाऱ्या मतदानात अमेरिकेला भारताचं मत पाहिजे. कारण काही कारवाई करायची असेल तर १५ पैकी १२ मते तरी अमेरिकेला पाहिजेत. जर भारतानं यात सहभाग नाही घेतला, तर अमेरिकेबरोबर सुधारलेल्या संबंधावर परिणाम होऊ शकतो. उलटपक्षी भारताचा ऐतिहासिक मित्र व शस्त्रास्त्रांचा पुरवठादार रशियाला दुखवणं भारताला जमणार नाही. कारण अनेक वेळा रशियानं भारताची मदत केली आहे. भारत-पाकिस्तान युद्धावेळी जगाला धमकी देण्याचं धारिष्ट्य रशियानं दाखवलं होतं. परंतु सध्याच्या रशियाच्या विस्तारवादी धोरणाचं समर्थन भारताच्या नैतिकतेमध्ये कितपत बसेल, हे सांगता येत नाही. मागच्या वर्षी इस्राएल-पॅलेस्टाईन संघर्षात युनोमध्ये आपली भूमिका स्पष्ट करत असताना भारतानं हिंसेचा विरोध करत आम्ही नैतिकतेच्या बाजूनं उभे आहोत' असं सांगितलं होतं आणि इस्राएलसारख्या मित्रराष्ट्राला पाठिंबा नाकारला होता, हेही या ठिकाणी लक्षात घेतलं पाहिजे. म्हणजे भारताला खूप विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल, कारण त्यावरच आपल्या भविष्यकालीन परराष्ट्र धोरणाची नीती ठरणार आहे आणि चीनला रोखण्यासाठी मित्रांनाही जपावं लागणार आहे.

# राज्यात सर्व जिल्ह्यांत व तालुक्यात १२ मार्चला राष्ट्रीय लोकअदालत!

**मुंबई/प्रतिनिधी**




विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतुदी अंतर्गत राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, यांनी संपूर्ण राज्यात तालुका, जिल्हा व उच्च न्यायालयात एकाच दिवशी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले आहे. राष्ट्रीय लोकअदालत १२ मार्च २०२२ आयोजित करण्यात आलेली आहे, असे महाराष्ट्र राज्यविधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी कळविले आहे.

**मुंबईतील सर्व न्यायालयात १२ मार्चला लोक अदालतीचे आयोजन**

न्यायालयीन प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे तसेच दिवाणी दावे आपसी सामंजस्याने मिटविण्याबाबत राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण हे वेळोवेळी लोक अदालतीचे आयोजन करीत असते. त्या अनुषंगाने राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार शनिवार १२ मार्च रोजी मुंबईत सर्व न्यायालयात लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याद्वारे दूरचित्रसंवाद प्रणालीच्या माध्यमातून प्रकरणे तडजोड करून मिटविण्याची मुभा देण्यात आली आहे.

**लोकअदालतीत ठेवण्यात येणारी प्रकरणे**

धनादेश अनादराची प्रकरणे, बँकेची कर्ज वसुली प्रकरणे, कामगारांचे वाद, विद्युत आणि पाणी देयकाबाबतची प्रकरणे, तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, आयकर कायद्यातील फौजदारी स्वरूपातील तडजोड प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रकरणे, वैवाहिक वाद, संपादन प्रकरणे व दिवाणी दावे तसेच उपरोक्त नमूद स्वरूपातील दाखल पूर्व प्रकरणे सुनावणी करिता ठेवण्यात येणार आहेत. तरी ज्या पक्षकारांना वर नमूद प्रकारची प्रकरणे दि. १२ मार्च २०२२ रोजी लोकअदालतीत ठेवावयाची आहेत. त्या पक्षकारांनी संबंधित न्यायालयात आपल्या प्रकरणात विनंती अर्ज लवकर सादर करावा व प्रकरण सामंजस्याने तात्काळ मिळवावे असे आवाहन मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे तथा नगर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबईचे प्रधान न्यायाधीश उर्मिला जोशी-फलके व सचिव हितेंद्र वाणी यांनी केले आहे.

**राष्ट्रीय लोक अदालतीचे फायदे**

प्रकरणात जमा केलेली संपूर्ण कोर्ट फी परत मिळते. लोकअदालतीतील निवाड्यास कुठल्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. सामंजस्याने वाद मिटल्यामुळे वेळ व पैसे दोन्हींची बचत होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना आपली बाजू स्वत: मांडण्याची संधी मिळते. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी कळविले आहे.

# जागतिक श्रवण दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी**

उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटीझम अँड मल्टीडिसेबिलिटी रिसर्च सेंटर, लातूर येथे जागतिक श्रवण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. श्रवण दिनाचे औचित्य साधून उमंग सेंटर येथे मोफत श्रवण तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनिल खमितकर यांनी केले तर प्रमुख पाहूणे म्हणून दिव्यांग कल्याण विभागाचे प्रमुख राजू गायकवाड, सिध्दीविनायक प्रतिष्ठाणचे सचिव किरण उटगे, जिल्हा समन्वयक समग्र शिक्षाचे आनंद महानुरे उपस्थित होते. या शिबीरा दरम्यान श्रवण बाधित्व येण्यापुर्वीच्या चाचण्या उपलब्ध असून त्या चाचण्या करुन घेण्यात याव्यात तसेच ० ते ६ वयोगटातील लहान बालकांची चाचणी करुन दोष आढळल्यास उपचार करण्याच्या पध्दती सद्यस्थितीत उमंग सेंटरमध्ये उपलब्ध आहेत याचा लाभ लाभार्थ्यांनी घेण्याबाबत डॉ. अशिष कुमार, स्पिच थेरेपिस्ट यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी जागतिक श्रवण बाधित दिन श्रवण बाधित बालकांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आशिष कुमार, डॉ. रवी शंकर आजाद, डॉ. निकिता फड, डॉ.राणी रोडगे, व्यवस्थापक श्रीहरी गोरे, माणिक करमले यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाउंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

07 TO 13 MARCH 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:51 PM Page 1



# जैन इरिगेशनची फ्युचर फार्मिंग शेतीमधील नवदृष्टी- राज्यपाल

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी जाणून घेतले जैनचे उच्च कृषितंत्रज्ञान

**जळगाव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशनच्या माध्यमातून कृषिक्षेत्रात शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य अव्दितिय असेच आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार केला असता कमी जागा, कमी पाण्यात चांगल्या गुणवत्तापूर्ण शेतमालाचे उत्पादन ही काळाची गरज ठरणार असून फ्युचर फार्मिंगमधील शेती नवीदृष्टी ठरू शकते अशी प्रतिक्रिया राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी फ्युचर फार्मिंग (भविष्यदर्शी शेती) या प्रकल्पाला भेट दिली त्यावेळी दिली. जैन इरिगेशनचे शेतीमधील नवनवीन प्रयोग देशातील अधिकाधिक शेतकरी बांधवांना कळल्यास ते त्यांच्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरतील. जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी भविष्यातील काळाची पाऊले ओळखून त्या दृष्टीने साकारलेल्या उच्च तंत्रज्ञान, फ्युचर फार्मिंग, माती विरहीत शेती, सॉईललेस मीडिया, व्हर्टिकल फार्मिंग, भाजीपाला, स्ट्रॉबेरी, पुदिना, खिरे काकड्या, हळद, आले, टोमॅटो, ब्रोकोली आदी प्रयोगांच्या ठिकाणी राज्यपाल्यांनी भेट देऊन मोठ्याउत्सुकतेने माहिती जाणून घेतली. शेतीतील या प्रयोगांमुळे जैन इरिगेशनने जणू कृषि विश्वाची निर्मिती केली आहे. राज्यपालांनी फ्युचर फार्मिंग लॅबमध्ये एरोपोनिक बटाटा या प्रयोगाची माहिती



घेतली. या प्रयोगात भविष्याची अन्नाची वाढती गरज आणि नवतंत्रज्ञान यांचा सुरेख मेळ एरोपोनिक्स बटाटा प्रयोगात आहे. नैसर्गिक संसाधने सिमीत असतील व त्याउलट लोकसंख्या वाढलेली असेल त्या संसाधनांमध्ये अन्न धान्याच्या उत्पादनाला मर्यादा येणार आहे. आपण जमिनी, पाणी व अन्य निसर्गदत्त घटक वाढवू शकत नाही परंतु एरोपोनिक्स बटाटा यासारख्या नवतंत्राचा पुरेपूर उपयोग करून भविष्यात चांगला पर्याय उभा करू शकतो असे राज्यपाल जैनचे उच्च कृषितंत्रज्ञान समजावून घेताना म्हणाले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या जैन हिल्स येथील दौऱ्यात कंपनीच्या कॉर्पोरेट प्रोफाईलीची माहिती देणाऱ्या परिश्रम भवनास भेट दिली. यासह जैन हिल्स परिसरातील अत्यंत निसर्गरम्य अशा 'भाऊंची सृष्टी' या भाऊंच्या स्मृतिस्थळास भेट दिली. श्रद्धेय भवरलालजी जैन हयात असताना त्यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण स्थळात ते रमले. भाऊंच्या सृष्टी येथे असलेल्या वाटिकेत त्यांच्याहस्ते आंबा रोपेचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, उपाध्यक्ष अनिल जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन व अतुल जैन तसेच काही निवडक वरिष्ठ सहकारी देखील यावेळी उपस्थित होते. या भेटी दरम्यानच्या प्रवासात त्यांनी विविध फळांच्या लागवड क्षेत्रांचीही पाहणी केली. ज्या परिसरात वॉटर युनिव्हसिटी उभारली जाणार आहे तो परिसर त्याची संकल्पना समजून घेतली. याबरोबरच जगातील सर्वात मोठ्या टिश्युकल्चर उत्पादन केंद्र म्हणून नावारुपास आलेल्या केळीच्या टिश्युकल्चर लॅब आणि प्रायमरी हार्डनिंग प्रकल्पास भेट दिली. या लॅबमध्ये तयार होणाऱ्या उत्पादनांची निर्मीती व थेट शेतकऱ्यांपर्यंत हे उच्च तंत्रज्ञान कसे पोहोचते याची माहिती त्यांनी जाणून घेतली. या प्रवासात त्यांनी भविष्यातील शेती (फ्युचर ॲग्रिकल्चर) येथे व्हर्टिकल फार्मिंग, मातीविना शेती, हायड्रोपोनिक्स शेती या सह भविष्यातील शेती याबाबतच्या तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली. या उच्च कृषी जैवतंत्रज्ञानाची ओळख करून घेण्यासाठी त्यांनी बायोटेक्नॉलॉजी लॅबचीही आवर्जून भेट घेतली. त्याबाबतची माहिती सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन व अतुल जैन, डॉ. अनिल ढाके, डॉ. बी. के. यादव, डॉ. अनिल पाटील, के. बी. पाटील यांनी करून दिली.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वाडा बस स्थानक व वाचनालयात कार्यक्रमाचे आयोजन!



**वाडा/प्रतिनिधी**

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त मराठीतील ज्येष्ठ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने रविवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी वाडा आगाराच्या वतीने वाडा बस स्थानकात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन वाडा आगारचे व्यावस्थापक मधुकर धांगडा यांनी केले होते. या प्रसंगी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर शंभर वर्षाची परंपरा असलेल्या येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात नव नवीन पुस्तकांचे दालन उपलब्ध करून पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. समाजात वाचनसंस्कृती अधिक रुजावी व पुस्तके वाचकांपर्यंत पोहचावीत या हेतूने वाचकांसाठी पुस्तकांचे दालन खुले करण्यात आले होते.

## भिवंडीतील सळई माफियांवर कारवाई करण्याची मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी परिसरात मोठ्या प्रमाणात सळई माफियाचा सुळसुळाट झाला असून याकडे स्थानिक पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याने ठाणे पोलिस आयुक्त यांनी लक्ष घालून कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. सळई माफिया मनू यादव यांना कोनगाव पोलिसांचे अर्थपूर्ण सहकार्य असल्याचा आरोप करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसात भिवंडी परिमंडळ २च्या हद्दीमध्ये रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन सळई माफिया यांचे गुंडाराज सुरू आहे. मुंबई-नाशिक महामार्गावर रात्रीच्या वेळी खुलेआम सळई चोरीचा धंदा मोनू यादव यांचा सुरू आहे. या धंद्याला कोनगाव पोलिसांचे अर्थपूर्ण सहकार्य आणि अभय आहे. मोठ मोठे कंटेनर मधून रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर चोरीचा माला उतरवला जातो.

या कंटेनरच्या गर्दीमुळे पिंपळस फाटा, सरवली गाव, रांजनोली नाका या ठिकाणी अनेक वेळा अपघात झाले आहे. त्यात काही लोकांचा मृत्यू देखील झाला आहे. परंतु लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या आणि आपली तिजोरी भरणाऱ्या मोनू यादव नामक सळई माफियावर अद्याप भिवंडी पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही वाढते अपघात पाहता अनेक सुज्ञ नागरिक, समाजसेवक आणि स्थानिक नागरिक यांनी वेळोवेळी तक्रारी करून सुद्धा हा सळई चोरीचा गोरख धंदा बंद होत नाही. त्यामुळे ठाणे पोलीस आयुक्त यांनी या गंभीर प्रकाराकडे गांभीर्याने घेऊन येथील सुरु असलेले सळई माफिया राज बंद करावे आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी जोर धरीत असून ठाणे पोलिस आयुक्त कारवाई करतील अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-नाशिक महामार्गालगत रांजनोली इथं टाटा आमंत्रण बिल्डिंगच्या जवळ तसेच गोवे येथील एमआयडीसी त्याचप्रमाणे कोनगाव पोलीस ठाण्याच्या बाजूला तर बबुशा इंडस्ट्रियल पार्क इथं आणि मुंबई नाशिक महामार्गावरील ओम साई वजन काटा, अशा पाच विविध ठिकाणी मोनू यादव हा खुलेआम कंटेनर ट्रेलर तसेच १२ टायरवाल्या मोठ्या गाड्यांमधून सळई तस्करी करून गोरख धंदा करत आहे.

हा धंदा सरळ सरळ चोरीचा असून चालकाला मॅनेज करून लोखंडी सळईचा माल उतरवला जातो आणि तो दुसऱ्या मार्गाने विकला जात असून मोनू यादव याच्या विरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत, तरीही कोनगाव पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्यामुळे यादव याचा खुलेआम सळईचा गोरख धंदा सुरु असून या सळईच्या वाहनांमुळे अपघाताच्या घटनाही घडल्या असल्याने मोनू यादवचा गोरख धंदा तात्काळ बंद करावा अशी मगणी सामाजिक कार्यकर्त्यांनीही ठाणे पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे.

## युक्रेन देशातून आपल्या मायदेशी परतला व सांगितली भयानक युद्धाची आपबिती!

**अंबरनाथ/प्रतिनिधी**



बदलापूर मांजर परिसरात राहणारा विद्यार्थी ज्ञानरंजन बेहरा हा अखेर परतला आपल्या मायदेशी. ज्ञानरंजणे आठवडाभर काढले युद्धजन्य दिवस. अखेर रोमांनीय सीमा गाठत भारतीय दुतावसाच्या मदतीने केला भरत देश्याप्रयन्त प्रवास.तो सुखरूप पोहचल्याने आई वडिलांचा आंनद गगणाला भिडला बेहरा कुटुंब खूब खुश होत. भारत सरकारचे मानले आभार. ध्यानरंजनाचे वडील चितरंजन बेहरा कुर्ला करसेडाला कामाला आहे, आई गृहिणी आहे. ध्यानरंजणला डॉकटर बनायचे होते.तो एकोणवीस वर्ष्याचा आहे. त्याचे शिक्षण बारावीपर्यंत अंबरनाथ मधील केंद्रीय विद्यालययात पूर्ण झालं.

पुढे एमबीबीएस वैद्यकीय पदवी पूर्ण करण्यासाठी २०२१ डिसेंबर रोजी युक्रेनला गेला. युक्रेंच्या विनेशिया न्यास्नल युनिवर सिटीला प्रवेश घेतला. पहिल्या वर्षीय शिक्षणाचे दोनच महिने पूर्ण झाले होते.अचानक युद्धाला सुरवात झाली. या युद्धा मूळे भारतीय दुतावसाकडून सूचना देण्यात आली की, ज्यांना जायचे आहे, त्यांनी आताच जावं अशी सूचना करण्यात आली. त्यानंतर धनरंजाणणे चार मार्चचे विमानाचे तिकीट काढले. आठवड्या अगोदरच रशियाने युक्रेनवर हल्ला चढवला. यामुळे शहरातील विमान शेवा बंद करण्यात आली. आणि ध्यानरंजन विनेशिया शहरात अडकला. या काळात विनेसिया शहरात हल्ला झाला नसला तरी, शहारा पासून पन्नास ते साठ किलोमीटर अंतरावर दूर असलेल्या रासायनिक कारखान्यावर हल्ला करण्यात आला. विनशिया शहरात धोक्याची सूचना देण्यात आली.धोक्याची सूचना दर्शवण्या साठी सायरनचा उपयोग करण्यात आला.एक सायनं वाजून आमला सावध करून वसतिगृहच्या जवळच असलेल्या बणखर मध्ये घेऊन गेले.

दुसरा सायरान वाजला की ज्यास्त सावध व्हा. तिसरा वाजला की शत्रू आपल्या परिसरात घुसला आहे. चौथा वाजला की शत्रू आपल्या परिसरात घुसून हल्ला सुरु केला आहे. पाचवा सायरान वाजला की जिथे आहे तिथेच राहा बाहेर पडू नका. अशी मार्गदर्शन लाईन दुतावसाकडून सांगितली होती असा ज्ञानरंजन सांगत होता. फक्त आमच्या सुरेक्सेसाठी तीनच सयरान वाजवण्यात आले. या संखटातून मार्ग काढत खाजगी बसने रोमानिया सीमेवर पोहचलो. विनेशिया शहरात अडकलेल्या पाचसे ते सहासे विद्यार्थी होते. भारतीय विदयार्थी सोबत नजरिया, अमेरिका, कॅनेडिया येतील देशातील मुलांचा समावेश होता. युक्रेन रोमोनिया सीमेवर पोहचल्यावर युक्रेंचे पोलीस युक्रेंच्या नागरिकांना प्राध्यान्य द्यायचे. विद्यार्थ्यांना मारहाण करून हवेत गोळीबार करायचे. त्यामुळे दोन दिवस अडकून पडलो होतो. त्या नंतर रोमोनिया सीमेवर प्रवेश करण्यात आला. युक्रेन मधून रोमोनियात आल्यावर भारत सरकारने चांगली काळजी घेतीली ध्यानरंजन सांगत होता.

दुसरी कडे आपला एकुलता एक मुलगा असल्यामुळे आपल्या पाल्याला आणण्यासाठी बेहरे कुटुंब प्रचंड धावपड करत होते. ते मुळचे उडीसा राज्यातले असून त्यांनी उडीसा सरकार कडे सुद्धा धाव घेतली होती.रशियाडून युक्रेन मध्ये कीव व खर्गीव शहरात ज्यास्तच हल्ले होत आहे. भारत सरकारने गंगा अप्रेशनश वापरून विद्यार्थना मायदेशी घेऊन आले. बेहरे कुटुंबियां कडून भारत सरकारला विनंती केली की जे भारतीय विद्यार्थी युक्रेन मध्ये असतील त्यांना सुद्धा आपल्या देशात लवकर आणण्याचा प्रयत्न करावा.

## वसईत पोलिसांचे फिरते वाचनालय

वसई: मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे पोलिसांसाठी पोलीस ठाण्यात फिरते वाचनालय सुरू करण्यात आले आहे. पोलिसांच्या पेटय़ांमध्ये पुस्तके ठेवून या पुस्तक पेटय़ा सर्व पोलीस ठाण्यात फिरत्या ठेवल्या जाणार आहेत. यामुळे पोलिसांना हवी ती पुस्तके वाचता येणार आहे. पोलीस ठाण्यातील कार्यालयीन काम, सतत लोकांचा राबता, बंदोबस्त आणि तपास कामे यामुळे पोलिसांना वाचन करता येत नाही. परिणामी वाचनातून मिळणाऱ्या आनंदाला आणि ज्ञानापासून ते वंचित राहतात. पोलिसांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांना सहज पुस्तके उपलब्ध व्हावी यासाठी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी फिरत्या वाचनालयाची संकल्पना राबवली.

## ऊर्जामंत्री नितीन राऊतांच्या प्रतिकात्मक फोटोला वंचित बहुजन आघाडीचं 'जोडे मारो' आंदोलन!

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**



उल्हासनगर मध्ये वंचित बहुजन आघाडी तर्फे राज्यातील ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्या व्यक्तव्याचा निषेध करून प्रतिकात्मक फोटोला जोडे मारो आंदोलन केलंय. नितीन राऊत यांच्या विरोधात घोषणाबाजी करून अनोखं आंदोलन केलं.आंदोलनात वंचितचे असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. उल्हासनगर कॅम्प ५ गांधी रोड येथील तहसील कार्यालयात समोर वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यातील ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊतांच्या वक्तव्याचा निषेध करत जोडे मारो आंदोलन केलंय. ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांनी एका सभेत वंचितचे नेते बाळासाहेब आंबडेकर यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य होत. या व्यक्तव्याचा निषेध करत उल्हासनगर जिल्हा वंचितने प्रतिकात्मक फोटोला जोडे मारो आंदोलन केलं. यावेळी वंचितचे ठाणे जिल्ह्यातील नेते सारंग थोरात, शहरअध्यक्ष शेषराव वाघमारे,महासचिव प्रवीण माळवे, महिलाध्यक्षा रेखा उबाळे, शहर संघटक प्रकाश सिरसाट, प्रवक्ता सुरेश सोनावणे, उज्वल महाले, सह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी वाडा तालुक्यातील विविध केंद्रांमधून २५५८ सोडवला पहिला पेपर




**वाडा** : इयत्ता १२वी २०२२ (उच्च माध्यमिक) च्या परीक्षा शुक्रवार (दि.४ मार्च)पासून सुरू झाल्या असून वाडा तालुक्यातील विविध परीक्षा केंद्रांमधून एकूण २ हजार ५५८ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषयाचा पहिला पेपर सोडवला. वाडा तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर ६१५, गुहीर आश्रम शाळा ११२, पी.जे. महाविद्यालयात ६२१, ह. वी. पाटील विद्यालय ३७६, उचाट हायस्कुल १९५, नॅशनल हायस्कुल १६२, देवगाव आश्रम शाळा१०७, अंबिस्ते हायस्कुल ७४, के.डी. गंधे ज्युनिअर कॉलेज २२, परळी आश्रम शाळा १२२, तुसे हायस्कुल ३८, गारगाव आश्रम शाळा ६४ व पाली आश्रमशाळा ५० या केंद्रातून विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या १३ केंद्रांमध्ये विध्यार्थ्यांची बैठकीची व्यवस्था केली होती.

## थोडक्यात वृत्तांत

### स्मारकसाठी मंगेशकर कुटुंबीयांनी मार्गदर्शन करावे!



मुंबई : लता मंगेशकर यांचे गायन आणि त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्वच अलौकिक असे होते. त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव करणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक राज्य शासनातर्फे उभारण्यासाठी मंगेशकर कुटुंबियांनी मार्गदर्शन करावे, अशी विनंती सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी केली. देशमुख यांनी मंगेशकर कुटुंबियांची घरी जाऊन सांत्वना भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. लता दीदींच्या धाकट्या भगिनी उषा मंगेशकर आणि बंधू हृदयनाथ मंगेशकर, माजी आमदार उल्हासदादा पवार, संगीतकार मयुरेश पै यावेळी उपस्थित होते. सुमारे ४० वर्षांपूर्वी लातूरमध्ये प्रथमच एका महाविद्यालयाला दिनानाथ मंगेशकर यांचे नाव देण्याची लातूरकरांची विनंती दीदींनी मान्य केली होती, अशी आठवण सांगत देशमुख यांनी लता दीदींच्या लातूरशी निगडित आठवणी जागवल्या. दिवंगत विलासराव देशमुख आणि दीदींना एकमेकांबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्याबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला. लता दीदींच्या कार्याचा उचित सन्मान करण्यासाठी उत्कृष्ट असे संगीत संग्रहालय शासनाला उभारता येईल, असे सांगून देशमुख यांनी याबाबत मंगेशकर कुटुंबियांचा मानस जाणून घेतला. याबाबतच्या सूचना कुटुंबियांकडून शासनाला पत्राद्वारे कळविण्यात येतील, असे हृदयनाथ मंगेशकर यांनी यावेळी सांगितले.

### बाधित शेतकऱ्यांना ९७ कोटी ४९ लाख ६७ हजाराची मदत!

लातूर : माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्याने बाधित शेतकऱ्यांना उर्वरित मदतीचे वाटप करण्यासाठी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०२१/ प्र.क्र. २५८/म-३, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ अन्वये निश्र्चित केलेल्या वाढीव दरानुसार उर्वरित आवश्यक निधी लेखाशिर्ष २२४५२४५२ अंतर्गत रुपये ६६ कोटी ५८ लाख २२ हजार व लेखाशिर्ष २२४५२३०९ अंतर्गत रुपये ३० कोटी ९१ लाख ४५ हजार याप्रमाणे एकूण रक्कम ९७ कोटी ४९ लाख ६७ हजार इतका निधी संबंधित तहसीलदारांना वितरीत करण्यात आलेला आहे. लातूर तालुक्यासाठी १५ कोटी ९२ लाख ४ हजार , औसा तालुक्यासाठी १७ कोटी ३५ लाख ३७ हजार, रेणापूर तालुक्यासाठी ९ कोटी ३७ लाख ३६ हजार, निलंगा तालुक्यासाठी १७ कोटी ७४ लाख २४ हजार , शिरुर अनंतपाळ तालुक्यासाठी ३ कोटी ८२ लाख २९ हजार , देवणी तालुक्यासाठी ३ कोटी ८८ लाख ७६ हजार, उदगीर तालुक्यासाठी ८ कोटी ४६ लाख १२ हजार, जळकोट तालुक्यासाठी ४ कोटी ३५ लाख ५५ हजार, अहमदपूर तालुक्यासाठी ६ कोटी ८० लाख १९ हजार , चाकूर तालुक्यासाठी ९ कोटी ७७ लाख ७५ हजार असे जिल्ह्यात एकूण ९७ कोटी ४९ लाख ६७ हजार इतका निधी संबंधित तहसीलदारांना वितरीत करण्यात आलेला आहे, असे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले आहे.

### बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधमोहिम व प्रतिबंध कार्यवाहीची जिल्हास्तरीय बैठक

लातूर : जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधमोहिम व प्रतिबंधासाठी येत्या १५ दिवसांच्या आत प्रत्येक तालुकानिहाय समित्या स्थापन करण्यात याव्यात. तसेच त्या-त्या तालुक्यातील समित्यांनी बोगस वैद्यक व्यावसायिकांची माहिती तयार ठेवावी. या समित्यामार्फत बोगस डॉक्टरांविरुध्द कार्यवाहीसाठी पंचनामे करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच नागरिकांनी बोगस डॉक्टरांविरुध्द माहिती प्रशासनास द्यावी, जेणे करुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी निर्देश दिले. जिल्ह्यातील बोगस वैद्यक व्यवसायिकावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीची (बोगस वैद्यकीय व्यावसायिक प्रतिबंध) बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकींत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. देशमुख, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे, मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत माले, डॉ. आर्चना पंडगे, डॉ. बरुरे बी. एस. आदि जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी तसेच संबंधित विविध विभागाच्या विभाग प्रमुखांची यावेळी उपस्थिती होती.

### वाढीव क्रीडा गुणांसाठी प्रस्ताव १५ मार्च पर्यंत सादर करावेत - जिल्हा क्रीडा अधिकारी

लातूर : माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत क्रीडा आयुक्तांनी सर्व जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना सुचित केलेले आहे. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामूळे सन २०२१-२२ या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीसाठी बाबतीत इयत्ता सातवी व इयत्ता आठवी मध्ये शिकत असताना या खेळाडूने विविध स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात येईल. तसेच इयत्ता बारावी साठी प्रविष्ठ होणाऱ्या (खेळाडू) विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर विद्यार्थी इयत्ता नववी व इयत्ता दहावी मध्ये शिकत असताना या खेळांडूनी विविध स्तरावरील स्पर्धेतील सहभाग विचारात घेवून सन २०२०-२१ मध्ये क्रीडा गुणांची सवलत देण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यातील पात्र खेळाडू विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी व शिक्षण मंडळाचा क्रीडा सवलत गुणासाठी असलेला जुनाच फॉरमॅट वापरुन परिपूर्ण प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. सदर प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च २०२२ आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, औसा रोड,लातूर येथे संपर्क साधावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी मदनलाल गायकवाड यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

07 TO 13 MARCH 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:46 PM Page 1



# एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात ओरल पॅथॉलॉजी दिन साजरा!

**लातूर/प्रतिनिधी**

मुख हा प्रत्येकासाठी महत्वाचा अवयव असून मुख आणि दात निरोगी असतील तर शरीर निरोगी राहण्यास मदत होते. मुखातील दात, हिरड्या, हाडे, सांधे, ग्रंथी, त्वचा आणि मुखाभोवतील स्नायूं यांना विकार जडल्यास तोंडी रोगनिदान शास्त्र (Oral Pathology) या शाखेतील तज्ज्ञांकडून विविध चाचण्याव्दारे रोगांचे अचूक निदान केले जाते. मुख - दंत रोगाचे अचूक निदान केल्याने रुग्णास वेळेत उपचार देवून आजार बरा करता येतो, असे प्रतिपादन एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील तोंडी रोगनिदान शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनुजा मनियार यांनी केले. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ओरल पॅथॉलॉजी विभाग येथे डॉ. एच. एम. ढोलकीया यांची जयंती व राष्ट्रीय ओरल पॅथोलॉजी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. अनुजा मनियार बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, डॉ. वर्षा सांगळे, डॉ. स्मिता चावरे, डॉ. विजयालक्ष्मी, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. शिल्पा बिक्कड, डॉ. प्रिया लहाने, डॉ. गौरी उगीले, डॉ. अश्रि्वनी बिरादार, डॉ. रिचा पंढरीकर यांची उपस्थिती होती. ओरल पॅथॉलॉजी या शाखेव्दारे विविध प्रकारच्या चाचण्यांच्या माध्यमातून मुख व दंत रोगांचे निदान करता येते. मासाचा तुकडा, पेशी विज्ञान व रक्ताची तपासणी करुन रोगाचे निदान केले जाते असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. अनुजा मनियार म्हणाल्या की, नियमित




तपासणी, योग्य निदान आणि वेळेत उपचार ही त्रिसुत्री अमलात आणून रुग्णावर वेळेत उपचार केले जातात. ओरल पॅथॉलॉजी दिनानिमीत्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतून ओरल पॅथॉलॉजी या विषयी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल, असे त्या म्हणाल्या. यावेळी राष्ट्रीय ओरल पॅथॉलॉजी दिनानिमीत्त 'स्पीन द व्हील' ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत बी. डी. एस. तृतीय वर्षातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या मध्ये दानिया बक्श प्रथम तर हाजरा शेख हिने व्दितीय क्रमांक पटकावला. परिक्षक म्हणून डॉ. वर्षा सांगळे, स्मिता चावरे यांनी काम पाहिले. तसेच 'सोप कार्वींग' या स्पर्धेत १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यात अमृता तकसाळे प्रथम तर अमृता कांबळे हिने व्दितीय क्रमांक मिळवला. परिक्षक म्हणून डॉ. विजयालक्ष्मी, डॉ. अमोल डोईफोडे यांनी काम पाहिले.पिक्टोप्लासिया या विषयावरील पोस्टर स्पर्धेत ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यामध्ये आदीती दर्डा, अंकिता भिंगोले, अक्षदा धस, महेश कापरे या गटाने प्रथम तर वेदिका जोगदंड, केतकी कुंभार, ऐश्र्वर्या स्वामी, स्वेता देशमुख या गटाने व्दितीय क्रमांक पटकावला. परिक्षक म्हणून डॉ. शिल्पा बिक्कड, डॉ. प्रिया लहाने, डॉ. गौरी उगीले यांनी काम पाहिले तर फेस पेंटिग या स्पर्धेत सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मध्ये अपर्णा पाटील हिने प्रथम क्रमांक पटकावला. परिक्षक म्हणून डॉ. अश्रि्वनी बिरादार, डॉ. रिचा पंढरीकर यांनी काम पाहिले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंतरवासिता सायली मोरे, कैलास मालशेटवार, चैताली लोढा, राषी लटपटे, अंजली म्हेत्रे, तृप्ती गायके, श्रुती देशमुख, तंत्रज्ञ समद शेख यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिर परिसरातून भाविकाचे मोबाईल चोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर, कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांनी लातूर जिल्ह्यातील घडलेले गुन्हे,अवैध धंदे विरुद्ध कारवाई करण्यासाठी वेळोवेळी आदेशित केले होते. लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त १ फेब्रुवारी रोजी भाविक भक्तांची अलोट गर्दी झाली होती. या गर्दीचा फायदा घेत २ मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरल्याच्या तक्रारीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात गुरनं १०६/२०२२ कलम ३७९ भादंविअन्वये व गुरनं १०७/२०२२ कलम ३७९ भादंविअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचदरम्यान गांधी चौक पोलीस ठाण्याच्या डिबी पथकाला गुप्तबातमीदारामार्फत गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ताजोद्दीनबाबा दरग्याजवळ मोबाईल विक्रीसाठी उभा असलेल्या प्रफुल्ल श्रीमंत गायकवाड रा.सिद्धार्थ सोसायटी, लातूर यास ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याच्या खिशात गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल गुरनं १०६/२०२२ कलम ३७९ भादंविअन्वये व गुरनं १०७/२०२२ कलम ३७९ भादंविअन्वये गुन्ह्यांतील दोन्ही मोबाईल




असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता सदर मोबाईल त्याने गर्दीचा फायदा घेत ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकाचा चोरल्याचे सांगितले. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने आरोपीस चोरीतील २ मोबाईलसह अटक केली आहे. नमुद कारवाई कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर जितेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनात गांधी चौक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांच्या नेतृत्वात डिबी पथकाचे पोलीस अंमलदार डी. एम. मुळे, युसूफ शेख, शिवाजी पाटील, दत्तात्रय शिंदे, लाव्हरे यांच्या पथकाने बजावली आहे.



# महिला दिनाचे औचित्य साधून लाईफ केअर हॉस्पिटलचे शिबिराचे आयोजन

**उल्हासनगर/प्रतिनिधी**

उल्हासनगर मध्ये महिला दिनाचे औचित्य साधून लाईफ केअर हॉस्पिटलमध्ये महिलांच्या आरोग्यासाठी मोफत आरोग्य सेवा शिबिराचे आयोजन केलंय. गरीब गरजू नागरिकांनी शिबीराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन हॉस्पिटलचे संचालक डॉ. मोहम्मद शाहद्दीन यांनी केलं. उल्हासनगर कॅम्प -१ मधील प्रसिद्ध लाईफ केअर हॉस्पिटला ११ वर्ष पूर्ण होत आहे. गेल्या११ वर्षापासून लोकांच्या सेवेत आहेत. ११ वर्ष पूर्ण होत असल्याने महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी ५ मार्च ते ८ मार्च पपर्यत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन केलं आहे.उल्हासनगर मध्ये प्रथमच एका हॉस्पिटलच्या माध्यमातून शहरातील गरीब गरजू, नागरिकांसाठी मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. ईसीजी तपासणी, डोळे तपासणी, नॉर्मल डिलेव्हरी, अर्थोपेटी ऑपरेशन केली जाणार आहे. केवळ रेशन कार्ड, आधार कार्डवर मोफत सेवा आहे. महात्मा फुले योजने अंतर्गत आणि कॅशलेश अंतर्गत सेवा दिली जाणार आहे. ९०४९७२२३१३ ह्या मोबाईल नंबर संपर्क साधण्याच आवाहन करण्यात आले आहे.या आरोग्य शिबीराचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांनी घ्यावा असं आवाहन केलं आहे.

पान १ वरून....

## अनैतिक संबंधाचा सुखी संसाराला फटका...

कलह निर्माण होत आहे. अशाच प्रकार अंधेरीत उघडकीस आला आहे. पत्नीचे प्रियकराशी असलेले अनैतिक संबंध पतीला माहिती पडल्याने पतीला जीवे ठार मारण्यासाठी महिलेने प्रियकराला सुपारी दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी विवाहितेसह तिच्या बॉयफ्रेण्डला बेड्या ठोकल्या आहेत. अंधेरी पूर्वकडील वासुदेव मिश्रा मार्गावरील सरस्वती टॉवर, बी/९०१ मध्ये विरेन दिनेश शहा (वय ३८) हे पत्नी जीनल शाह (३५) सोबत राहत होते . या दोघांचाही संसार सुखाने चालला होता. त्याच्या संसारात कशाचीच कमी नव्हती. विरेंन शाह रोज नोकरी निमित्त घराबाहेर पडत असत आणि रात्री कामाहून घरी परतत असत. असा त्यांचा रोजचा दिनक्रम होता. १९ फेब्रुवारी रोजी विरेंन शाह हे अंधेरी पोलीस ठाणे हद्दीत जुनी पोलीस वसाहत, कोर्ट गल्ली, अंधेरी रेल्वे स्थानक (पू), येथून कामावर जात होते. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा मोटर स्कुटरवरुन आलेल्या दोघांनी त्यांच्यावर धारधार हत्याराने जीवघेणा हल्ला करून हल्लेखोर त्यांच्याकडील पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा मोटर स्कुटरवरुन अंधेरी कोर्टाच्या दिशेने भरधाव वेगाने पळून गेले. हल्ल्यात जखमी झालेल्या विरेंन शहा यांना तातडीने पोलिसांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. यावेळी विरेन दिनेश शहा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अंधेरी पोलीस ठाण्यात अज्ञात हल्लेखोरांचा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून परिमंडळ १० चे पोलीस उप आयुक्त महेश्वर रेड्डी व सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली अंधेरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संताजी घोरपडे यांच्या नियंत्रणाखाली तपास सुरु करण्यात आला. अंधेरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, गुन्हयातील आरोपीनी कोणतेही धागेदोरे मागे सोडले नव्हते. घटनास्थळावरील सीसी टीव्ही फुटेजच्या आधारे यातील संशयीतांचा मागोवा काढण्यात येत होता. हल्लेखोर हे पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा मोटर स्कुटरवरुन आल्याचे फुटेज मध्ये दिसत होते. पोलिसांनी त्या ॲक्टीवा मोटर स्कुटरचा शोध सुरू केला. विरेंन शहा हे नोकरी करणारी सर्वसामान्य व्यक्ती असल्याने त्यांच्यवर हल्ला करण्याचे कारण काय? असा प्रश्न पोलिसांना पडला. हल्लेखोरांनसोबत त्यांची काही वैयक्तिक दुष्मनी वैगरे होती का? याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी जखमी विरेंन व त्याची पत्नीच्या वापरत्या मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करुन त्याआधारे तपास सुरू केला. तांत्रीक तपासाच्या आधारे यातील हल्लेखोर हे गुजरात राज्यातील सुरत येथे असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली. वरिष्ठांची परवानगी घेऊन अंधेरी पोलिस ठाण्याचे स.पो.नि. क्षीरसागर, पो.उ.नि. पगार व गुन्हे पथक तातडीने सुरतला रवाना झाले. तेथे स्थानिक पोलीस ठाणे, नाडीयाड वेस्ट पोलीस ठाण्याच्या मदतीने सापळा रचून संशयीत आरोपी अभिषेक जीवनकुमार बारोट (२६) यास तो राहत असलेल्या घरातून १३ त्रिमुर्ती सोसायटी, पीज रोड, नाडीयाड, खेडा, गुजरात मधून ताब्यात घेतले. अभिषेक बारोट याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याचा साथीदाराचे नाव निष्पन्न झाले. त्यानुसार सपोनि क्षीरसागर, पोउनि पगार व पथक यांनी अठवालाईन्स पोलीस ठाणे, सुरत शहर यांच्या मदतीने पाहिजे आरोपी विपुल प्रविणभाई पटेल (३५) व्यवसाय रोड कॉन्ट्रॅक्टर, रा.ठि. २५/२६, ब्राम्हणीनगर सोसायटी, अमरोली सायन रोड, अमरोली, सुरत, गुजरात यास चौकशी करीता ताब्यात ताब्यात घेतले. पोलिसांनी या दोघांची कसून चौकशी केली असता, त्याचा या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने दोघांना या गुन्हयात अटक करण्यात आली. पोलीस पथक अभिषेक बारोट व विपुल पटेल या दोघांना अटक करून मुंबईत घेऊन आले. पोलीस ठाण्यात आणून त्यांचा पाहुणचार केला असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. अंधेरी पूर्वकडील वासुदेव मिश्रा मार्गावरील सरस्वती टॉवर, बी/९०१ मध्ये विरेन शहा व जीनल शाह (३५) हे दोघे पतिपत्नी सोबत राहत होते. विपुल प्रविणभाई पटेल हा रोड कॉन्ट्रॅक्टर असून त्याचे फिर्यादी विरेंन शहा याची पत्नी जीनल शाह सोबत अनैतिक संबंध होते. या संबंधाची माहिती विरेंन यांना लागली असता, त्या दोघा पतिपत्नीत तणाव निर्माण झाला. आपले बिंग फुटल्याने जिनलही घाबरली. तिने ही गोष्ट आपला प्रियकर विपूल ला सांगितली. विपुल पटेल याने आपला मित्र अभिषेक बारोट व प्रेयसी जिनल शाहा यांच्या मदतीने तिघांनी मिळून विरेन शाह याच्या हत्येचा कट रचला .त्यानुसार २९ फेब्रुवारी रोजी विरेंन शाह हे अंधेरी पोलीस ठाणे हद्दीत जुनी पोलीस वसाहत, कोर्ट गल्ली, अंधेरी रेल्वे स्थानक (पू), येथून कामावर जात होते. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा मोटर स्कुटरवरुन आलेल्या विपुल पटेल व अभिषेक बारोट या दोघांनी विरेंन शाहा यांच्यावर धारधार हत्याराने जीवघेणा हल्ला केला आणि गुजरातमध्ये पळून गेले. सुदवाने विरेंन या हल्लयातून बचावले. तपासात अटकेतील आरोपी विपुल पटेल याचे फिर्यादीच्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचे समोर आल्याने संशयित आरोपी विपुल पटेल आणि जीनल शाह यांनी विरेन शाह याच्या हत्येचा कट रचल्याचे सकृत दर्शनी तपासात निष्पन्न झाले. म्हणून जखमी विरेनची पत्नी जीनल विरेन शाह हिला देखील अटक करण्यात आलेली आहे. आरोपीना अंधेरी कोर्टात हजर करण्यात आले असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली ॲक्टिव्हा स्कूटर, गुन्हा करताना वापरलेले कपडे आणि हत्यार जप्त करण्यात आलेले आहे.

कोणताही सुगावा नसताना परिमंडळ १०चे पोलीस उपायुक्त महेश्वर रेड्डी, अंधेरी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली अंधेरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संताजी घोरपडे यांच्या नियंत्रणाखाली अंधेरी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि क्षीरसागर, पोउनि पगार व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोहवा पेडणेकर, पोहवा कांबळे, पोना. सुरनर, सुर्यवंशी, जाधव, पो.शि. सोनजे, लोंढे, कापसे, मोरे, अविनाश जाधव, कांबळे, बाबर, केतन पाटील, नरबट यांनी अत्यंत चिकाटीने व मेहनतीने हा गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यातील संशयित आरोपी विपुल पटेल, मित्र अभिषेक बारोट व प्रेयसी जिनल शाहा या तिघांना अटक करून त्यांच्या विरुद्ध अंधेरी पोलीस ठाणे, गु.र. क्र. ७७/२२ कलम ३०७, १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी पोलीस कोठडीत असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पावडे हे करीत आहेत.

## दारुड्या पतीला संशयाने ...

रिचवल्यानंतर मायाबाईला जास्तच त्रास देत होता. पती प्रकाशच्या त्रासाला वैतागून मायाबाई आपल्या आईच्या घरी पाचोरा तालुक्यातील खाजोडा या गावी राहण्यास आली होती. मायाबाईची वयोवृद्ध आई भारताबाई एकटीच रहात होती. मायाबाई तिच्याकडे राहण्यास आल्याने दोघा मायलेकींना एकमेकींचा सहारा झाला. दोघी मोलमजुरी करुन सोबत राहू लागल्या. दोन वर्षाचा कालावधी लोटला. या कालावधीत मायाबाई तिच्या आईकडेच रहात होती. त्यामुळे प्रकाश तिच्या चारित्र्यावर जास्तच संशय घेऊ लागला. तिघा मुलांचे लग्न झाले व एकाचे लग्न बाकी असतांना मायाबाई आणी प्रकाश यांचा वाद संपुष्टात येण्याचे नावच घेत नव्हता. त्यामुळेच ती आईला सोडून पतीकडे येण्यास तयार होत नव्हती. काही महिन्यापुर्वी मायाबाईचा पती, सासरा व त्याचा मुकादम असे तिघे जण मायाबाईची समजूत घालून तिला घेऊन जाण्यासाठी आले. यापुढे मायाबाईला त्रास दिला जाणार नाही असे आश्वासन प्रकाशने मायाबाईला दिले. मात्र यापुढे मायाबाईला त्रास दिला जाणार नाही असे तिच्या आईने वकीलामार्फत प्रकाशकडून लिहून घेतले. वेळ मारुन नेण्यासाठी प्रकाशने तसे लिहून दिले. त्यामुळे मायाबाई तिच्या पती व सासऱ्यासोबत सासरी नांदण्यास गेली. मात्र घरी आल्यानंतर प्रकाशने आपल्या वागण्यात काही बदल केलाच नाही. दारु पिऊन आल्यानंतर तो मायाबाईला पुन्हा त्रास देऊ लागला. तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला शिवीगाळ व मारहाण करण्याचा प्रकार पुन्हा सुरु झाला. नवऱ्याच्या त्रासाला वैतागून आणि पोटात दुखत असल्यामुळे ती प्रकाशला न सांगता चाळीसगावला पिर मुसा कादरी बाबाच्या दर्ग्यावर उपचारासाठी एकटीच निघून आली. वाटेत तिला तिची आई भेटली. तिची आई तिला पिर मुसा कादरी बाबाच्या दर्ग्यावर घेऊन आली. त्या ठिकाणी तिची नणंद सौ. सिंधुबाई भिल दोघींना भेटली. ती देखील तिच्या मुलीच्या उपचारासाठी गेल्या तिन महिन्यापासून दर्ग्यावर आली होती. तिच्यासोबत मायाबाई व तिची आईदेखील दर्ग्याच्या बाजुला पालाच्या झोपडीत मुक्कामाला थांबल्या. तेथेच झोपडीत राहून तेथील अन्नपदार्थ खाऊन सर्व जण रहात होत्या. काही न सांगता पत्नी घरातून गायब झाल्याचे बघून प्रकाश संतापला होता. त्याच्या मनात तिच्या चारित्र्याचे भुत पुन्हा संचार करु लागले. काही दिवसांपुर्वी दुसऱ्याच्या मोबाईलवरुन मायाबाईने पतीला सांगितले की पोटात दुखत असल्यामुळे मी चाळीसगाव येथे दर्ग्यावर उपचारासाठी आली आहे. माझा इकडे तिकडे कुठेही शोध घेऊ नका. पत्नी मायाबाईचा ठावठिकाणा समजल्यानंतर प्रकाश अजुनच संतापला. संतापाच्या भरात तिला भेटण्यासाठी तो चाळीसगाव येथील पिर मुसा कादरी बाबाच्या दर्ग्यावर आला. २६ फेब्रुवारीच्या सकाळपासून तो दारुच्या नशेत मायाबाईला त्रास देऊ लागला. तु मरते का मी मरु असे म्हणत त्याने दारुच्या नशेत शिवीगाळ करत दिवसभर तिला त्रास दिला. या भांडणामुळे तिच्यासह तिची आई व नणंद असे सर्वजण वैतागले.

२६ फेब्रुवारीच्या रात्री सर्व जण जेवण करुन झोपडीच्या बाहेर गोधड्या टाकून झोपले होते. रात्री बारा वाजेच्या दरम्यान अचानक मायाबाईच्या किंचाळण्याचा आवाज तिच्या आईला आला. त्यामुळे मायाबाईची आई व नणंद अशा दोघी जणी झोपेतून लागलीच उठल्या. मायाबाईच्या नाका तोंडातून रक्त वहात असल्याचे त्यांना दिसले. जवळच एक भला मोठा दगड देखील पडलेला होता. दोघींना बघून प्रकाशने तेथून पलायन केले. आरडाओरड करुन दोघींनी त्याचा पकडण्यासाठी पाठलाग केला. मात्र तो पलायन करण्यात यशस्वी झाला. मायाबाईवर तिचा पती प्रकाशनेच हल्ला केल्याचे तिच्या आईला कळून चुकले होते. या घटनेची माहिती देण्यासाठी तिने चाळीसगाव शहर पोलिस स्टेशन गाठले. माहिती दिल्यानंतर ती तातडीने दर्ग्यावर परत आली. तिच्या पाठोपाठ लागलीच पोलिस आणि रुग्णवाहिका दाखल झाली. जखमी मायाबाईला रुग्णवाहिकेतून चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले गेले. मायाबाई मोठ्या प्रमाणात जखमी झालेली होती. डॉक्टरांनी तिच्या डोक्यावरील जखमेवर पट्टी बांधून पुढील उपचारासाठी धुळे येथे घेऊन जाण्यास सांगितले. त्याच रुग्णवाहिकेतून जखमी मायाबाईला धुळे येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. मात्र उपचारादरम्यान मायाबाईचा मृत्यु झाला. प्रकाश उर्फ भुरा रामदास सोनवणे (रा. मुखेड ता. सोयगाव जिल्हा औरंगाबाद) याने त्याची पत्नी मायाबाईच्या डोक्यात दगड टाकून हत्या केल्याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भारताबाई विक्रम गायकवाड हिने दिलेल्या फिर्यादीनुसार भाग ५ गु.र.न. ८५/२२ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक दिपक बिरारी यांच्याकडे देण्यात आला. स.पो.नि. दिपक बिरारी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने फरार संशयीत आरोपी प्रकाश सोनवणे यास ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरु आहे.

## मतदार जागृती करण्यासाठी स्पर्धाचे आयोजन

लातूर : भारत निवडणूक आयोगाने २५ जानेवारी २०२२ ते १५ मार्च २०२२ या कालावधीत राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धाच्या अंतर्गत प्रश्न मंजुषा स्पर्धा, व्हिडीओ तयार करण्याची स्पर्धा, पोस्टरची डिझाईन करण्याची स्पर्धा, गाण्याची स्पर्धा व घोषवाक्य (SIogan) तयार करण्याची स्पर्धा आयोजित केल्या आहेत असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी, लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. या स्पर्धेची सविस्तर माहिती https//ecisveep.nic.in/contest/ येथे उपलब्ध आहे. या स्पर्धेमध्ये अधिकाधिक स्पर्धकांनी भाग घ्यावा या करिता संबंधित मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांनी पुढील प्रमाणे प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी. या स्पर्धेचे पोस्टर, गाईडलाईन्स, व्हिडीओ याची स्थानिक वृत्तपत्र, समाज माध्यम, विविध व्हाट्सप , टेलिग्राम ग्रुपवर प्रचार व प्रसिध्दी करावी. या स्पर्धेची माहिती मतदार केंद्र स्तरीय अधिकारी, छडड,छधघ,छउउ, चशवळर वैंीशी व इतर संबंधित व्हट्सप, टेलिग्राम ग्रुप वर स्र्धेच्या कालावधीत नियमितपणे पाठविण्यात यावी. समाज माध्यमांवर माहिती अपलोड करतेवेळी हॅशटंग झ्रुशीजषजपश तेंीश याचा वापर करण्यात यावा.जिल्ह्यातील विद्यापीठ, महाविद्यालय, शाळा यांच्या प्रशासनाला अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.या शैक्षणिक संस्थांना स्पर्धेतील पोस्टर त्यांच्या नोटीस बोर्डवर लावण्यासाठी आणि व्हट्सअूप, ई-मेल व्दारे विद्यार्थ्यांमध्ये प्रसारीत करण्यात यावी.

पान ८ वरून...

## भाजपमुक्त लातूर पॅटर्न मराठवाड्याच्या...

पंचायत समिती सदस्य रमेश सोनावणे, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा स्वाती विक्रम जाधव, तनुजा पडसाळगे, निलंगा तालुका भाजपाचे माजी शहराध्यक्ष संजय सुधाकर सुभेदार, निलंगा येथील ज्येष्ठ भाजपा नेते आबासाहेब गोविंदराव पाटील, माजी पंचायत समिती सदस्य निलंगा विलास विनायक लोभे, अनुसुचित मोर्चा लातूरचे जिल्हाध्यक्ष अनिता सुधाकर रसाळ, निलंगा बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड सुनिल तुकाराम माने, निलंगा बार असोशिएशनचे सचिव प्रविण नरहरे, एमआयएम निलंगा अध्यक्ष मनजीब अब्दुल सौदागर, अनिल चव्हाण, उमाकांत प्रल्हाद सावंत, खुदबुद्दीन घोरपडे, माजी जिल्हा परिषद सदस्य देवानंद मुळे ड. मनोज आलमले, ड.प्रवीण नरहरे, ड.सुनील माने, राजेश्र्वर मोटे, दीपक जाधव, बालाजी देवकते, उमाकांत सावंत, खुदबुद्दीन घोरवाडे, युवराज घोगरे, विठ्ठल मुळे, विलास लोभे, शेषेराव श्रीमाळे, मनीषा बोळशेटटे, दतता लोभे, वामन जाधव, भानुदास वाडीकर, बालाजी शिंदे, रामलिंग पडसाळगे, इस्माईल शेख, प्रदीप पाटील, सोमनाथ लांडगे, दादाराव जाधव, मुजीब सौदागर, समंदर कादरी, इम्रान सय्यद, आवेज शेख, माधव राठोडे, नामदेव लोभे, रमेश शेळके, ज्ञानदेव लाभे, पंढरी सूर्यवंशी, सोमनाथ जाधव, बालाजी पांचाळ, ज्योतीराम जाभोळे, सागर बोळशेट्टी, शुभम जाधव, भानुदास कदम, शेखर पाटील, दत्ता माने, बाळू माने, गणेश माने, बिबीशन माने, राजू शिंदे, सहदेव जरे, शेषराव गंगथडे, शिवाजी माने, अमोल माने, तम्मा इटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रवेश घेतला. या सर्वांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, राज्याचे वैदयकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख, मंत्री सुनील केदार, आमदार धीरज देशमुख यांनी अभिनंदन करून पूढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## प्रजा सुराज्य पक्षाचे बेरोजगार ...

मिना ताडेल महिला उपाध्यक्षा वसई विरार शहर जिल्हा, मिना तडवी महिला सचिव वसई विरार शहर जिल्हा प्रजा सुराज्य पक्ष यांनी सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. असिफ खान युवा अध्यक्ष वसई विरार शहर जिल्हा यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख मार्गदर्शन, प्रमुख पाहुणे आणि पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे आभार मानले.

## उदगीरात ९५वे अखिल भारतीय मराठी...

पत्रकारांचे स्वातंत्र्य आंदोलनात योगदान या विषयावर परिसंवाद ठेवावा, अशा विविध मौलिक सुचना पत्रकार एम.जी.मोमीन, सुरेश पाटील नेत्रगावकर, व्ही.एस. कुलकर्णी, युवराज धोतरे, राम मोतीपवळे, अर्जुन जाधव, राजीव मोघले, सुनिल हवा, बालाजी स्वर्णकार, रमेश कोतवाल, शकिल मनियार, बालाजी टाळीकुटे, विक्रम हालकिकर, बस्वेश्वर डावळे, लक्ष्मीकांत मोरे, अजहरोद्दीन शेख, प्रदिप ब्रह्मपुरीकर आदि पत्रकारांनी आपले विचार मांडले. यावेळी नागराळकर म्हणाले, पत्रकारांच्या सुचनाचा आदर करून संमेलन चांगले बनवण्याचा शंभर टक्के प्रयत्न करु, समारोपात नामदार संजय बनसोडे म्हणाले. साहित्य संमेलना प्रकरणी पत्रकारांनी सकारत्मक बातम्या दिल्याने चांगले वातावरण निर्माण झाले आहे. दिलेल्या सुचनांचा अंमल करून पत्रकारांचा सन्मान राखला जाईल. पत्रकारानी आयोजक म्हणून सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. पत्रकारांनी साहित्य संमेलनासाठी देणगी जाहिर केली. सुत्रसंचलन प्रा.प्रविण जाहुरे यांनी केले.

## बाह्य स्वछतेसोबत अंतर्मनाची स्वच्छता...

नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे महाले गुरुजी, गभाले गुरुजी, किरण पाटील, सुजित भानुशाली व अनेक दास उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी स्वच्छता मोहिमेत भाग घेऊन समाजाच्या उत्तम आणि निरोगी आरोग्यासाठी स्वच्छता किती महत्वाची आहे ते सांगितल. या अभियानात पोलीसा आणि तालुका प्रशासनाच्या सहभागामुळे हे अभियान चांगल्या प्रकारे यशस्वी झाले.

07 TO 13 MARCH 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:46 PM Page 1



# ऊस गाळप आडवणूकीतून मुक्त होण्यासाठी हक्काचा प्रकल्प उभारणार -आ.रमेशअप्पा कराड

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी आणि कार्यकर्त्यांची होणारी आडणूक आणि पिळवणूक यातून मुक्त होण्यासाठी शेतकऱ्यांच्या आग्रहाखातर प्रतिदिन २ हजार मेट्रीक टन ऊस गाळप क्षमतेचा प्रकल्प लातूर तालुक्यात उभा केला जात असल्याची माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी ऊस उत्पादक शेतकरी नोंदणी शुभारंभ प्रसंगी बोलताना दिली. नोंदणीच्या पहिल्याच दिवशी तब्बल साडेतीन हजार शेतकऱ्यांनी प्रकल्प उभारणीत योगदान देण्यासाठी नोंदणी केली. मांजरा परिवारातील साखर कारखान्याचे शेतकरी सभासद हे मालक असताना प्रस्थापितच मालक होवून बसले आहेत. शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका घेण्याऐवजी कारखान्याच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील बहुसंख्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांची आडवणूक करून मोठया प्रमाणात पिळवणूक करीत असल्याने अनेकजण अडचणीत सापडले आहेत. अशा ऊस उत्पादकांना न्याय मिळावा यासाठी अनेक शेतकऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी लातूर तालूक्यात प्रतिदिन २ हजार मेट्रीक टन ऊस गाळप करणारा गुळ पावडर व खांडसरी या बरोबरच सहा मेगावॅट वीज निर्मिती करणारा प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेतला. नियोजित पुर्णब्रम्ह योगिनी प्रयाग शुगर्स या प्रकल्पाच्या उभारणीसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या नोंदणीचा शुभारंभ जेष्ठ मार्गदर्शक श्री. तुळशीरामअण्णा कराड यांच्या हस्ते शुक्रवार रोजी झाला. या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत नामदेव बिडवे रा.पिंपळगाव अंबा, सुधाकरनाना काळे रा. शिराळा, अल्काताई जुगल रा. गातेगाव, अंतराम कणसे रा. पोहरेगाव, गुणवंत कारंडे रा. वरवडा या शेतकऱ्यांनी आपली नोंदणी केली. नोंदणीच्या पहिल्याच दिवशी जवळपास साडेतीन हजार ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी केली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव देशमुख, प्रदेश उपाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, प्रगतशील शेतकरी काशीराम कराड, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, विक्रम शिंदे, राजेश कराड, भागवत सोट, अमोल पाटील, त्र्यंबकआबा गुटे, लालासाहेब पाटील, डॉ. बाबसाहेब घुले, गोविंद नरहारे, अनिल भिसे, साहेबराव मुळे, हणमंतबापू नागटिळक, सतिष अंबेकर, विजय काळे, बन्सी भिसे,



अनंत चव्हाण, सुरेंद्र गोडभरले, ॲड.दशरथ सरवदे, सुरज शिंदे, शाम वाघमारे, महेंद्र गोडभरले, राजकिरण साठे, वसंत करमुडे, पदमाकर चिंचोलकर, यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. शासनाच्या नियमानुसार मांजरा परिवारातील साखर कारखान्यांनी गाळप केलेल्या ऊसाला एफआरपी प्रमाणे भाव द्यावा यासाठी आंदोलन केले तरीही अद्याप या कारखान्याकडून शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे भाव मिळालेला नाही. हा लढा अजून संपलेला नाही. जर आज न्यायालयात गेलो तर एफआरपी निश्र्चित मिळेल पण कारखान्याचे गाळप परवाने रद्द होवून शेतकऱ्यांचे नुकसान होईल यासाठी आज आम्ही शांत आहोत. कष्टाचा मोबदला घेतल्याशिवाय राहणार नाही असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की चालू गळीत हंगामात कार्यक्षेत्रातील गावागावात बहुसंख्य शेतकऱ्यांचा ऊस उभा आहे. तरीही या कारखान्याचे गाळप विक्रमी झाले. गाळप झालेला ऊस कोठून आला कोणाचा आला असा प्रश्न उपस्थित करून पंधरा सोहळा महिने ऊस उभा असून उशीरा ऊस गेल्यावर निश्र्चितपणे वजनात घट येत आहे. दिवाळीत कारखाने सुरू झाले असते तर शेतकऱ्यांचे नुकसान झाले नसते. शेतकऱ्यांची ही झालेली नुकसान भरपाई कोण देणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला. गेल्या पंधरा वीस वर्षात माझ्याकडे काहीच नसताना अनेकांनी साथ दिली, माझ्यावर प्रेम केले, माझे मावळे बागायतदार नसतील पण स्वाभिमानी आहेत. त्यांच्या ताकतीवर भल्याभल्यांना त्यांची जागा दाखवून दिली. आज आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने पक्षाने मला आमदारकी दिली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देवू शकलो नाही तर त्या आमदारकीचा काय उपयोग असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या डोळयातील अश्रू पुसण्याचे काम करणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी करून नियोजित या गुळपावडर व खांडसरी प्रकल्पाच्या उभारणीत योगदान द्यावे असे आवाहन केले. प्रारंभी दिलीपराव देशमुख, विक्रम शिंदे, भागवत सोट, हणमंतबापू नागटिळक, साहेबराव मुळे, सुरज शिंदे, दशरथ सरवदे, पद्माकर चिंचोलकर, रशिद पठाण यांनी आपले मनोगत व्यक्त करून शेतकऱ्यांच्या हितासाठी हा प्रकल्प वरदान ठरणार असल्याचे सांगीतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले तर गोविंद नरहरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास लातूर रेणापूर तालुक्यासह औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ऊस उत्पादक शेतकरी मोठया संखेने उपस्थित होते.

# मनसेना जनहित कक्ष आणि विधी विभागांवर गणेश लाड यांची उपजिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती!



**वसई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष अध्यक्ष राज ठाकरे यांच्या व अँड.किशोर शिंदे मनसे सरचिटणीस जनहित कक्ष व विधी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यांच्या आदेशानुसार गणेश लाड यांची मनसे जनहित कक्ष व विधी विभागात वसई विरार जिल्हा उप-जिल्हा संघटक पदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली. सदरची नियुक्ती मनसे प्रमुख कार्यालय मुंबई राजगड येथे मनसे सरचिटणीस व जनहित कक्ष व विधी विभाग महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अँड किशोर शिंदे यांच्या शुभहस्ते तसेच जनहित कक्ष व विधी विभागांचे मान्य वर सर्व सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस यांच्या उपस्थित करण्यात आली. त्यामुळे वसई विरार जिल्ह्यांत मनसेला नवीन उभारणी येणार आहे. कारण गणेश लाड एक सामाजिक कार्यकर्ता असून तसेच पत्रकार, आरटीआय कार्यकर्ता म्हणून हि देखील ओळखले जातात. तसेच व त्यांनी आजवर विविध त्यांच्या उत्कृष्ट सेवा प्रतिष्ठाण मार्फत सामाजिक कार्य सुध्दा केले आहे. त्यांचा आज पर्यतचा प्रशासकीय कामाचा अनुभव तसेच प्रशासकीय यंत्रणावर त्यांचा असलेला दरारा बघता त्यांचा सर्वोत्तम परीने मनसेला फायदाच होणार आहे.

कार्यकर्तामध्ये एक नवीन आनंदाचे चैतन्य असे वातावरण निर्माण झाले. तथा चर्चा चालू आहे की गणेश लाड सारखे तरूण तडफदार पत्रकार सामाजिक कार्यकर्ता पक्षा लाभल्याने पक्षाला उभारणी येईलच, पण त्यांचा प्रशासकीय कामाचा अनुभव असलेल्या ने त्यांचा विषेश फायदा सर्व कार्यकर्ता होईल. जेणेकरून आज पर्यंत ज्या ज्या कार्यकर्त्याची प्रशासकीय कामे रखडलेली आहे ती त्याच्या अभ्यासानुसार मार्गी लागतील अशी सर्व कार्यकर्त्याकडून इच्छा व्यक्त केली जात आहे. तसेच पक्षाने योग्य त्या व्यक्तीची नियुक्ती केल्यामुळे सर्व कार्यकर्त्याकडून राज ठाकरे व ॲड. किशोर शिंदे यांचे विषेश आभार व्यक्त केला जात आहे. सदर प्रसंगी आमच्या प्रतिनिधीने गणेश लाड यांच्या शी संपर्क केला असता गणेश लाड अशी भावना व्यक्त केली की सन्माननीय राजसाहेब ठाकरे व माझे गुरूवर्य ॲड. किशोर शिंदे साहेब यांनी जो माझ्यावर विश्वास दाखवला आहे त्याला मी जरा हा देखील तडा जाऊ देणार नाही तसेच मला जी संधी दिली आहे विश्वास ठेऊन त्या संधीचे मी सोने करील.

# ठिबक सिंचन तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या समृद्धीचा राजमार्ग -डॉ.जडे

**पारोळा/प्रतिनिधी**

पारंपारीक शेतीमध्ये पिकांचे उत्पादन कमी का मिळते कारण लागवडीमध्ये वापरण्यात येणाऱ्या निविष्ठांची कार्यक्षमता अवधी ३० ते ४० टक्के मिळत असल्याने पारंपारिक पद्धतीने पिकांचे उत्पादन कमी मिळते व नफा ही कमी मिळतो. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्याने निविष्ठांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्के मिळेल त्यामुळे उत्पादन अधिक मिळून आर्थिक फायदा अधिक मिळेल. राज्यामध्ये पाण्याची टंचाई विजेची टंचाई, मजुरांची उलब्धता, खतांची टंचाई ह्या मोठ्या समस्या शेतीमध्ये आहेत ह्या समस्यांवर उपाय ठिबक सिंचन तंत्रज्ञान असुन शेतकऱ्यांच्या समृद्धीचा ठिबक सिंचन तंत्र राजमार्ग आहे असे जैन इरिगेशनचे वरीष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. बी.डी. जडे कोळपिंप्री ता. पारोळा येथे साईकृपा ठिबक एजन्सी आयोजित पीक परिसंवाद कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. व्ही. एम. पाटील यांच्या मोसंबी, आंबा, केळी, गहू, हरभरा पिके असलेल्या शेतांमध्ये शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. डॉ. बी. डी. जडे ह्या कापूस आणि मका लागवडीच्या प्रगत तंत्रज्ञानावर मार्गदर्शन केले.



कोरडवाहू कापूस पिकाचे एकरी १० क्विंटल आणि बगायती कापूस पिकाचे ठिबक सिंचन पद्धतीवर एकरी २० क्विंटल तसेच मका पिकाचे एकरी १०० क्विंटल उत्पादन कसे मिळविता येईल आणि एकाच पिकासाठी घेतलेला ठिबक सिंचन संच १२५ पेक्षा अधिक पिकांसाठी कसा वापर करता येईल ठिबक मधून पाण्यात विरघळणारी खते कशी द्यावीत ह्यावर मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी भरत वारे ह्यांनी कृषी विभागाच्या योजनांबाबत माहिती दिली. जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक दिलीप बऱ्हाटे ह्यांनी ठिबक सिंचन कसा निवडावा, संच दीर्घकाळ कार्यरत राहण्याकरीता गुणवत्ता कशी असावी, पाण्याच्या अचुक व्यवस्थापनाकरीता ऑटोमेशन तंत्राचा वापर करण्याची गरज असल्याचे सांगितले. ठिबक सिंचनद्वारे जमीन फक्त वाफसा अवस्थेत ठेवावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष जि.प. सदस्य रोहीदास दाजी होते. त्यांनी शेतकऱ्यांनी ठिबकमधुन फक्त पाणी न देता पाण्यात विरघळणाऱ्या खतांचा वापर म्हणजे फर्टिगेशन करावे. पारोळा पंचायत समितीचे उपसभापती अशोक नगराज पाटील, दहीवेलचे प्रगतीशील शेतकरी शिवाजी सुकदेव पाटील, गणेश पाटील तसेच कोळप्रिंपी परिसरातील अनेक शेतकरी कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक साईकृपा ठिबकचे संचालक सुदामभाऊ ह्यांनी केले. कार्यक्रमाचे संपुर्ण नियोजन संजीव भोई यांनी केले. विक्री अभियंता यांनी आभार मानले.

# वाडा मनोर महामार्गावर ट्रकला अपघात; काहीकाळ वाहतूक कोंडी



**वाडा/प्रतिनिधी**

सकाळच्या सुमारास महामार्गावर ट्रक पलटी झाल्याने काहीकाळ वाहतूक कोंडी झाली होती. वाडा मनोर महामार्गावरील सापने गावाच्या हद्दीत एक आयशर ट्रक पलटी होऊन अपघात ट्रक मधील तांदळाचे पोटे रस्त्यावर विखरून पडले होते. अपघातग्रस्त ट्रक महामार्गावरच पडून होता त्या दरम्यान वाहतूक कोंडी झाली होती, अपघातात ट्रक चालकाला किरकोळ दुखापत झाली होती. काळीवेळाने ट्रक रस्त्यातून बाजूला करून वाहतूक मोकळी करण्यात आली. हा ट्रक वाड्यातीलच एका तांदूळ विक्रेत्याचा असल्याचे समजले. सदर घटनेचा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### उल्हासनगरात वंचित बहुजन आघाडीमध्ये जोरदार इन्कमिंग

# सुभाष टेकडीतील समाजसेवक महेंद्र अहिरे यांचा जाहीर प्रवेश

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

पक्षप्रमुख आणि स्वाभिमानी नेतृत्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या स्वाभिमानी विचार आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून मोठया संख्येने युवकांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केलाय.उल्हासनगर शहर जिल्हा वंचित बहुजन आघाडीत जोरदार इन्कमिंग सुरू असून आगामी निवडणूकित पक्षाला चांगला फायदा मानला जात आहे. शहरात आंबडेकरी चळवळीचा बालेकिल्ला मानला जाणारा सुभाष टेकडी मध्ये शेकडो तरुणांनी वंचित बहुजन आघाडीत पक्षप्रवेश करून वंचितचा झेंडा हातात घेतलाय.

कॅम्प-४ येथील भाटिया चौक परिसरातील वंचितच्या मध्यवर्ती कार्यलयात ठाणे जिल्ह्यातील प्रमुख नेते सारंग थोरात, उल्हासनगर जिल्हाध्यक्ष शेषराव वाघमारे, शहर संघटक प्रकाश सिरसाट,प्रवक्ता सुरेश



सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली उडान सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र अहिरे यांनी शेकडो मित्र परिवारासोबत वंचित बहुजन आघाडीत जाहीर पक्ष प्रवेश केला. आज शहरात सुभाष टेकडी हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला अशी ओळख आहे.याला मजबूत टिकवून ठेवण्यासाठी एकमेव पर्याय वंचित आघाडी असल्याचं मत समाजसेवक महेंद्र अहिरे यांनी पक्ष प्रवेशावेळी व्यक्त केलं. प्रकाश आंबेडकर यांचं लक्ष तरुण युवकांना असून पक्षात तरुणांना संधी द्या पक्ष मजबूत करण्याची क्षमता त्यांच्यात असल्याची माहिती वंचितचे जिल्हाध्यक्ष शेषराव वाघमारे यांनी सांगितले.

# वसई विरार शहरामध्ये निर्बंध कायम

**वसई/प्रतिनिधी**

करोनाची तिसरी लाट ओसरल्याने राज्य शासनाने अनेक शहरांतील निर्बंध शिथिल केले आहेत. मात्र पालघर जिल्ह्यातील निर्बंध शिथिल न केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. वसई विरार महापालिकेतर्फे हे निर्बंध हटवावेत यासाठी पालघरम् जिल्ह्याधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठवला जाणार आहे. राज्य शासनाने निर्बंध उठविताना काही निकष ठेवले आहेत त्यात पहिली मात्रा घेतलेल्यांचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा अधिक, दुसरी मात्रा घेतलेल्यांचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षा अधिक आणि रुग्ण सकारात्मकतेचा दर हा १० टक्क्यांपेक्षा कमी असणे गरजेचे आहे. वसई-विरार हा पालघर जिल्ह्यात भाग आहे. वसई विरार महापालिकेने हे निकष पूर्ण केले असूनही अद्याप निर्बंध हटविण्यात आलेले नाही. शहरातील लसीकरण उत्तमरीत्या झाले असून रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे. राज्य शासनाचे सर्व निकष महापालिकेने पूर्ण केले आहेत अशी माहिती पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी दिली. वसई-विरार जरी स्वतंत्र महापालिका असली तरी अधिकार पालघर जिल्ह्याधिऱ्यांना आहेत, म्हणून निर्बंध पूर्णपणे हटविण्यात आले नाहीत, असे पालिकेचे उपायुक्त पंकज पाटील यांनी सांगितले. निर्बंध हटविण्यासाठी जिल्हयाधिऱ्यांना आयुक्तांच्या परवानगीने प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## चार वर्षीय मुलीचे 'इंडिया बुक ऑफ रेकार्ड'मध्ये नोंद!



अंबरनाथ : अंबरनाथ मधील एका चार वर्षीय मुलीने तब्बल २७ मिनिटात इंग्रजीचे तेरा पुस्तके वाचून केला विक्रम. सिओना भारतभूषण सुर्वे ही अंबरनाथ पूर्वे इथे राहते. पण सिओनाची बुद्धीमत्ता बघून आचार्य मोठं! खेळण्या बगडण्याच्या छोट्या वयामध्ये इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली. अंबरनामध्ये चहू बाजूंनी चिमुकली वर कौतुकाचा वर्षाव. सिओना ही दीड ते दोन वर्षाची असतांच भावाचे पुस्तकं चळण्याचा प्रयत्न करत होती. पण या मनी प्रमाणे मनातले ओळखणारी आई, भविष्य ओळखणारा बाप,हेच ह्या जगातील मोठे ज्योतिषी आहे. सिओनला पुस्तके चाळताना आणि वृत्त पत्र वरचे टायटल वाचण्याचा प्रयत्न करीत असल्याचा सिओनच्या आईच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्या मातेने सिओनला इंग्रजी बाल वत्सल्य विकत आणून तिला एबीसीडी शिकवली. एबीसीडी हळूहळू शब्द ओळख करून वाचायला शिकवलं. शिकवून चार वर्षांची होईपर्यंत इंग्रजी वाचण्यात तरबेज झाली. २७ डिसेंबर २०२१ रोजी अवघ्या २७ मिनिटात तेरा बाल वात्सलय इंग्रजी पुस्तकं वाचून इंडिया बुक ऑफ रेकार्ड पठकावला. सिओनाचे सर्वोतोपरी अंबरनाथ शहरात कौतुक होत आहे.

# सरकारी-जिल्हा परिषद-शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा दोन दिवसाचा नियोजित संप स्थगित

**लातूर/प्रतिनिधी**

सरकारी कर्मचारी-जिल्हा परिषद-शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समिती, महाराष्ट्राच्या माध्यमातून राज्यातील १७ लाख कर्मचारी-शिक्षकांनी दिर्घकाळ प्रलंबित असणाऱ्या मगण्यांसाठी दि.२३ व २४ फेब्रुवारी २०२२ या दोन दिवसांचा लाक्षणिक संप घोषित केला होता. त्यादृष्टीने महाराष्ट्रात संपाची जोरदार तयारी पाहून शासनाने चर्चेची द्वारे उघडण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने सकाळपासून लातूर जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात उपस्थित राहून सहभाग नोंदविण्यासाठी गर्दी केली होती. राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेच्या या लाक्षणिक संपात विविध संघटनांनी सहभाग घेतल्याने शासनाला कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर करण्यासाठी शासनाने मध्यवर्ती संघटनेला चर्चेसाठी पाचारण केले. शासनाच्या सकारात्मक भूमिकेचा सर्वांगिण विचार करुन राजय सरकारी मध्यवर्ती संघटनेने दुपारनंतर नियोजत संप संस्थगित करण्याची घोषणा केली. लातूर जिल्ह्यातील संपात सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे चेहेरे प्रफुल्लीत झाले आणि शासनाचे आभार मानले.

यावेळी लातूर जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बी.बी.गायकवाड, सरचिटणीस संजय कलशेट्टी, उपाध्यक्ष आर.एस.तांदळे, कोषाध्यक्ष गोविंद लाडेकर, संपर्क प्रमुख दीपक येवते, महसूल संघटने जिल्हा अध्यक्ष महादेव पांचाळ, ट्रेसर्स संघटना राज्याचे अध्यक्ष व्यंकटेश हालिंगे, माहिती व जनसंपर्क कर्मचारी संघटना गट 'क'चे विभागीय अध्यक्ष अशोक माळगे,दिलीप वाठोरे, रामकिसन तोकले, प्रविण बिदरकर, बालाजी केंद्रे, प्रादेशिक परिवहन विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष उमेश सांगळे,जिल्हा उपाध्यक्ष धनजंय लोढे, कृषि पर्यवेक्षक संघटनेचे अध्यक्ष नारायण लोखंडे, कल्याण घुगरे, अरुणा मोरे, भूमी अभिलेख संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष प्रल्हाद लखनगीरे, जिल्हा अध्यक्ष संजय जाधव, सचिव दिलीप देशमुख, लेखा परिक्षक विभागाचे प्रथमेश वैद्य, दुग्ध संघटनेचे सचिव एन.पी.पाटील, सहकार विभागाचे सचिव जे.जी. जाधव, कार्याध्यक्ष बालाजी पवार, जलसंपदा विभागाचे अध्यक्ष नितीन गायकवाड सचिव मंगेश पाटील, कार्याध्यक्ष श्री. स्वामी, पाटबंधारे विभागाचे सचिव कृष्णा कोकाटे, कार्याध्यक्ष जोशी, पोलीस विभागाचे प्रशांत माकणीकर, राजेश्वर कुलकर्णी, श्री.मस्के, पॉलिटेक्निक विभागाचे अध्यक्ष राहूल तुंगे सचिव दत्ता सोमवंशी, कार्याध्यक्ष युवराज कलशेट्टी, अमुल पाटील, वन विभागाने धनंजय चामे, धर्मदाय उपायुक्त कार्यालयाचे उपाध्यक्ष प्रमोद काळे, बी.ए.फुलसुंदर, नियाजन विभागाचे श्री. परभणकर, महेश कुलकर्णी, विशाल नेवासकर, रवी काळे, शंशीकांत स्वामी, अभयराज चव्हाण, प्रसिध्दी प्रमुख सचिन माळी, सार्वजनिक बांधकाम विभाग भाई श्रंगारे, श्री.पठाण, श्री. दहीफळे, हळणे, विक्रीकरचे श्री.पठाण श्री. मुंडे, कृषि विभाग लिपीक संवर्ग संघटनेचे सरचिटणीस अशोक जालान यांच्यासह विविध संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आदिंची मोठया संख्येने उपस्थिती होती. सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करुन बक्षी समितीचा अहवाल खंड-२ प्रसिध्द करणे, केंद्राप्रमाणे वाहतूक, शैक्षणिक, वसती गृह व शहरभत्ता लागू करावा, केंद्राप्रमाणे सर्व अनुज्ञेय भत्ते लागू करणे, केंद्राप्रमाणे महिलांना बालसंगोपन रजा मंजूर करावी, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज निकाली काढावेत, जानेवारी,२०१९ पासूनचा थकीत महागाई भत्याचा हप्ता फरकासह मंजूर करावा, सर्व रिक्त पदे भरावीत, खाजगीकरण व कत्रांटीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रलंबित मागण्या होत्या. प्रारंभी जिल्हा मध्यवती प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग नोंदवावा, यासाठी घोषणा, भाषणे, प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

07 TO 13 MARCH 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 05/03/2022 8:47 PM Page 1



# भाजपमुक्त लातूर पॅटर्न मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात पोहचवा -नाना पटोले

**मुंबई/प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून भविष्यातही हा ओघ असाच राहिल. लातूर जिल्ह्यातील भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये प्रवेश घेवून लातूर जिल्हा भाजपमुक्त करण्यास सुरुवात केली असून भाजपमुक्तीचा हा लातूर पॅटर्न मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात पोहचवा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले. गांधी भवन येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम झाला यावेळी लातूरचे पालकमंत्री तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, पशुसंवर्धन मंत्री सुनिल केदार, आमदार राजेश राठोड, आमदार धिरज देशमुख, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अॅड किरण जाधव, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, प्रदेश सरचिटणीस व लातूर जिल्हा प्रभारी जितेंद्र देहाडे, अभय साळुंके, सचिन दाताळ आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने सत्तेत येताना दिलेले एकही आश्र्वासन पूर्ण केले नाही. सत्तेत आल्यापासून भाजपाने संविधान संपवण्याचे काम सुरु केले आहे. तर महाराष्ट्राला बदनाम करण्याचे पापही केले जात आहे. महाराष्ट्राच्या दैवतांचा अपमान केला जात आहे. भाजपाला त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली असून आज लातूरमधून भाजपमुक्तीची सुरुवात झाली असून आता हे वातावरण मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात पोहचवा. मराठवाड्यात काँग्रेस पक्षाला मोठे यश मिळाले पाहिजे यासाठी जोमाने काम करा, असे आवाहन करत सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले.

यावेळी बोलताना लातूरचे पालकमंत्री तथा वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख म्हणाले की, शिवराज पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील निलंगेकर, स्व. विलासराव देशमुख यांनी काँग्रेस पक्षाला लातूर जिल्ह्यात भक्कमपणे उभे केले. आज मोठ्या संख्येने भाजपासह विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. हे सर्वजण तळागाळात काम करणारे कार्यकर्ते आहेत. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांवर काँग्रेसचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्वबळाचा




नारा दिला आहे त्यासाठी राज्यात काँग्रेस एक नंबरचा पक्ष करण्याकामी लातूर जिल्ह्याचा मोठा वाटा असेल. लातूर जिल्हयात माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर आणि माजी केंद्रिय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाभिमुख राजकारण आणि समाजकारण केले होते. आगामी काळात त्याच पध्दतीचे काम जिल्हयात होईल आणि काँग्रेस पक्षाला पुर्ववैभव प्राप्त करून दिले जाईल यातून राज्यात काँग्रेस प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले ज्या पध्दतीने प्रयत्न करीत आहेत त्यास बळ मिळणार आहे त्यास बळ मिळणार आहे. काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना सन्मान आणि योग्य प्रकारची संधी देण्यात येईल असे आश्र्वासनही पालकमंत्री देशमुख यांनी दिले. देशाच्या पातळीवर लातूर जिल्ह्याचा शिक्षणासह राजकारणात देखील एक वेगळा पॅटर्न असून या जिल्ह्याने सदैव माजी केद्रिंय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर, लोकनेते विलासराव देशमुख यांनी केलेल्या मार्गदर्शनावर जिल्ह्याच्या विकासाचा आलेख चढता राहीला आहे. येणाऱ्या काळात देखील जिल्ह्याचा विकास व आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अधिक यश मिळवून देण्यास आम्ही कटिबद्ध राहू असा विश्र्वास आपल्या मनोगतात प्रदेश काँग्रेस सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला. लातूर जिल्ह्यातील निलंगा, अहमदपूर, चाकूर, तालुक्यातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. विशेषतः निलंगा तालुक्यातील भाजपाच्या सर्व पदाधिकारी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, एमआयएमचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये निलंगा पंचायत समितीचे माजी सभापती अजित तुकाराम माने, निलंग्याचे माजी नगराध्यक्ष हमिद इब्राहिम शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस चक्रधर शेळके, ...पान ६ वर

# प्रजा सुराज्य पक्षाचे बेरोजगार व स्वयंरोजगार नोंदणी अभियान संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

मराठी भाषा दिवस व १९४७ ला डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची मुलभूत अधिकार व अल्पसंख्या विकास समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. या दोन मंगल दिनाचे औचित्य साधुन प्रजा सुराज्य पक्षाच्या वतीने भव्य बेरोजगार व सव्यरोजगार नोंदणी अभियान राबविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन दीपक कलिंगण राष्ट्रीय अध्यक्ष ऑल इंडिया फिल्म प्रोड्युसर टेकनीशियन अँड आर्टिस्ट युनियन तसेच अॅड.नवदित गुजर हाय कोर्ट मुंबई यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी दिपक कलिंगन यांनी अण्णासाहेब यांना शब्द दिला की रेल्वे आणि फिल्म इंडस्ट्रीत रोजगार मिळऊन देण्याची हमी घेतली आहे. तर अॅड गुजर साहेबांनी कायदेशीर प्रक्रियेच्या समस्या सोडऊन न्याय देण्याची माझी जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, कोणत्या पक्षाने काय केले... या भानगडीत मला पडायचे नाही! मला प्रजा सुराज्य पक्षाच्या वतीने पक्षाच्या संपर्कात आलेल्या प्रत्यक नागरीकाचे प्रश्न सोडविणे आणि त्यांचे मुलभूत अधिकार अबाधित ठेवण्यासाठी जे काही करणे शक्य होईल ते करण्याची माझी तयारी आहे, म्हणून सागतो आहे. तुम्ही हाक द्या! आम्ही साथ देऊ!! असे उदगार त्यांनी काढले सदर प्रसंगी प्रदीप गंगावणे यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलले की मागण्यापेक्षा देण्यासाठी स्वतःला तयार करा म्हणजे उद्योग क्षेत्रात जाऊन स्वतःला सिद्ध करा जेणेकरुन तुम्हाला नोकऱ्या निर्माण करता येईल असे केल्यास तुम्हा तुमच्या लोकान नोकरी देता येईल.

या कार्यक्रमास अब्दुल लतिफ शेख राष्ट्रीय उपाध्यक्ष, शिवदास मोरे राष्ट्रीय सचिव, संजय पवार अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश, मदिना फिरदौस उपाध्यक्षा महाराष्ट्र प्रदेश प्रजा सुराज्य पक्ष, मंदा वाघ युवती अध्यक्षा प्रजा सुराज्य पक्ष तसेच गोविंद पिंपळगावकर राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय जिवा सेना, संजय गायकवाड संस्थापक अध्यक्ष प्रेंथर रिपब्लिकन सेना, विनायक खर्डे संस्थापक अध्यक्ष स्वराज रक्षक संघ, जितेंद्र घोडगावकर शिरसाट कार्याध्यक्ष राष्ट्रीय बहुजन विकास संघटना, संजु तडवी उपाध्यक्ष प्रजा सुराज्य जनरल कामगार संघटना, अनिल वाघेला कोकण प्रांत अध्यक्ष, किशोर मोरे कोकण प्रांत उपाध्यक्ष, प्रिया मुंडे वसई तालुका अध्यक्षा, सलमा सय्यद वसई तालुका महीला जनसंपर्क इत्यादी मान्यवर व पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. असिफ खान युवा अध्यक्ष वसई विरार शहर जिल्हा, ...पान ६ वर

# उदगीरात ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नियोजन संदर्भात तीन तालुक्यातील पत्रकारांची बैठक




**देवणी/शकिल मनियार**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर हीरकमहोत्सवी वर्षानिमित आयोजित २२, २३ व २४ एप्रिल रोजी उदगीरमध्ये होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नियोजन संदर्भात देवणी-उदगीर-जळकोट या तीन तालुक्यातील पत्रकारांची बैठक स्वागत अध्यक्ष तथा नामदार संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालयात पार पडली. यावेळी व्यासपिठावार कार्याध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, प्रभारी प्राचार्य डॉ.आर.आर. तांबोळी, उप प्राचार्य डा आर के मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी विविध विषयावर चर्चा झाली. त्यामध्ये साहित्य संम्मेलनसाठी पत्रकारांसाठी असान व्यवस्था, पत्रकारांचा सन्मान व्हावा, पत्रकारांची संयुक्त समिती स्थापन करावी, पत्रकारातील साहित्यकांना संधी द्यावी, सिमावाद या प्रश्नावर परिसंवाद ठेवावा, सिमावर्ती पत्रकाराना साहित्य संमेलनाची माहिती द्यावी, उदगीरच्या इतीहासाची ध्वनीचित्रपित काढावी, ...पान ६ वर

# प्रामाणिकपणा हीच यशाची गुरुकिल्ली-पद्मश्री डॉ.लहाने



**लातूर/प्रतिनिधी**

प्रत्येक व्यवसायाचे एक तत्त्व असते. व्यवसाय करताना नीतीमुल्य जपली पाहिजेत.आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहिले पाहिजे. प्रामाणिकपणा हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे मत पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी व्यक्त केले. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट व्यवसाय-सेवा पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून डॉ.लहाने बोलत होते. रोटरीचे माजी प्रांतपाल विजयभाऊ राठी यांच्यासह रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष सतीश कडेल यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पद्मश्री डॉ.लहाने म्हणाले की, व्यवसाय करताना समाजसेवेचे धोरण पत्करले तर हजारो लोकांचे आशीर्वाद आपल्याला मिळतात. यातूनच आपले भाग्य बदलत असते. प्रत्येक व्यवसायाचे एक तत्त्व असते, नीतिमूल्य असतात. ते पाळले पाहिजेत, असेही ते म्हणाले. विजयभाऊ राठी यांनी विविध कसोट्यांवर तपासुन पुरस्कारार्थ्यांची रोटरीने निवड केली असल्याचे सांगत या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात मनपाच्या कोविड अंत्यविधी पथकातील कर्मचारी, सामाजिक लघुउद्योग चालविणारे राजस्थानी महिला मंडळ, न्युरोसर्जन डॉ.हनुमंत किनीकर, प्राण्यांच्या उपचार व सेवेमध्ये नैपुण्य मिळवलेले डॉ.नेताजी शिंगटे, शासकीय रुग्णालयातील परिचारिका श्रीमती कल्पना गायकवाड, लातूर सॉल्व्हंटचे मालक शांतीलाल साबू, पद्मावती हार्डवेअरचे अशोक कोटे, सूर्या दक्षिण इडलीगृहाचे सूर्यकांत महाजन आदींचा शाल, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष सतीश कडेल यांनी रोटरीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मन्मथ पंचाक्षरी,संचलन सचिन मालू व आभार प्रदर्शन व्होकेशनल सर्व्हिसेसचे डायरेक्टर चंद्रप्रभू जंगमे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिनेश सोनी, विशाल अयाचित, मोतीलाल वर्मा, ओमप्रकाश झुरुळे, प्रकाश बियाणी, श्रद्धानंद अप्पशेट्टी, रवींद्र बनकर, सोनू डागवाले, डॉ.रवी रेड्डी, राजाराम दावणकर, उमाताई व्यास, श्रवण बियाणी शांतेश्वर येरटे, डॉ.श्रीनिवास भंडे, किशन कुलेरिया ,अनिल कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# गांधीतीर्थ हे तर भारतातील पाचवे धाम -राज्यपाल

## तरुण पिढीसह सर्वांसाठीचे हे प्रेरणास्थान असल्याचा गौरव

**जळगाव/प्रतिनिधी**

पूज्य बापूंच्या स्मरणार्थ बांधलेले गांधी धाम हे भारतातील पाचवे धाम असल्याचे दिसते. बापूंचे जीवन आणि जीवन दृश्य येथे चित्रित केले आहे. लहान मुली-मुले आणि तरुण पिढी येथे येऊन प्रेरणा घेऊ शकतात. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, स्वदेशी, सदाचार आदींचे शिक्षण घेऊन देश चालवणारे देशाला नवी दिशा देऊ शकतात. श्री भवरलाल जैन यांची कल्पनाशक्ती वाखाणण्याजोगी आहे. बापूंच्या चरणी विनम्र अभिवादन! अशी लिखीत प्रतिक्रिया महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी नोंदविली. महामहीम राज्यपाल यांनी जैन हिल्सस्थित गांधीतीर्थ ला भेट दिली. गांधी तीर्थ येथे जैन इरिगेशनचे अध्यक्ष तथा गांधी रिसर्च फाउंडेशनचे संचालक अशोक जैन, डॉ. सुदर्शन आयंगार यांनी त्यांचे स्वागत केले, या वेळी अतुल जैन सोबत उपस्थित होते.

संपूर्ण जगाला गांधी विचारांची अनिवार्यता असून गांधी विचारांचे संस्कार अत्याधुनिक पद्धतीने युवा पिढीसमोर गांधी तीर्थ पोहचवित आहे. त्यांचे हे कार्य पाहून माननीय राज्यपाल भारावले. जगातिल सुप्रसिद्ध



अशा ऑडिओ गाईडेड म्युझियम खोज गांधीजी की या संग्रहालयास महामहीम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी सुमारे तासभर भेट दिली. गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त अशोक जैन, डॉ. सुदर्शन आयंगार यांनी राज्यपाल महोदयांचे सुतीहार देऊन स्वागत केले. गांधी रिसर्च फाउंडेशनचे मुख्य समन्वयक उदय महाजन, डॉ. अश्विन झाला, नितीन चोपडा उपस्थित होते. गांधी तीर्थ साकारतांना भवरलालजी जैन यांनी शेती, माती, पाणी आणि शेतकरी तसेच देशाचा, तरुणाईच्या भल्याचा विचार केला. तरुणांना गांधीजींचा आदर्श अनुभवता यावा यासाठी त्यांनी जैन हिल्स येथे गांधी रिसर्च फाउंडेशन, गांधी तीर्थची निर्मिती केली. या माध्यमातून युवाशक्ती, तरुणांबद्दल तसेच ग्रामविकास, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्याबाबत ते सदैव प्रयत्नशील होते. त्यादृष्टीने गांधी रिसर्च फाउंडेशनचे निर्मिती उद्दीष्टाचे कार्य आजदेखील प्रभावीपणे होत आहे.

# बाह्य स्वछतेसोबत अंतर्मनाची स्वच्छता सुद्धा तितकीच महत्वाची-सपो.निरीक्षक प्रदीप गीते



**विक्रमगड/प्रतिनिधी**

बाह्य स्वछतेसोबत अंतर्मनाची स्वच्छता सुद्धा तितकीच महत्वाची असते असे प्रतिपादन सहा.पोलीस निरीक्षक प्रदीप गीते यांनी केले आहे. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने विक्रमगड येथे स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद लाभला. यावेळी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सेवेकरी आणि विक्रमगड मधील नागरिक मोठ्या संखेने हजर होते. यावेळी बोलताना गीते यांनी सांगितले कि नानासाहेबांचे समाजासाठी असलेले काम हे मार्गदर्शक असून त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेले त्यांचे अनुयायी हे गावागावात जावून स्वच्छतेचे काम तर करतातच त्याच बरोबर ज्ञानार्जन व प्रभोदनातून समाजाच्या अंतर्मनाची स्वच्छताही चांगल्या प्रकारे करतात. या प्रसंगी नानासाहेब धर्माधिकारी यांचे फलकाची समाजसेवक भगवान सांबर, नगर पंचायत नगराध्यक्ष निलेश पडवळे, उप नगराध्यक्ष महेंद्र पाटील, नायब तहसीलदार बेलापुरे, तसेच ...पान ६ वर

# खरीवली येथील मोरीच्या कामाचा शुभारंभ



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील खरिवली-बिलावली-चिंचघर या जोड रस्त्यावरील खरीवली तर्फे पौलबार येथील ठाकरे पाडा या ठिकाणी काही वर्षापूर्वी मोरी खचली होती, व हा रस्ता रहदारीचा असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना खूप त्रास होत होता. याची दखल घेऊन पालसई जिल्हा परिषद गटाच्या जिल्हा परिषद सदस्या मिताली बागुल यांनी ते काम तात्काळ सुरु करण्याच्या सूचना केल्या होत्या त्यांनी स्वतः त्या कामाचा शुभारंभाचा नारळ फोडला व काम सुरु करून दिले व हे काम पूर्ण होई पर्यत काही दिवस प्रवास्यांनी इतर मार्गाचा वापर करावा अशी विनंतीही त्यांनी केली आहे. या मोरीमुळे काही कंपन्यांची वाहने, खाजगी तसेच प्रवासी वाहने यांची गैरसोय दूर होऊन कुडूस वरून न जाता मधून चिंचघर ला निघता येणार आहे व तेथील आसपासच्या गावातील लोकांचा वेळ वाचणार आहे.


स्वराज्य राज्यव्यापी कामगार संघटना



नोंदणी क्रमांक - काउआ/ठाणे/१९८०/२०२२ स्थापना : २०२२

संस्थापक अध्यक्ष

श्री. प्रशांत आर. धोंडे

संपर्क : ७३५०३१६४८७

कार्यालयीन पत्ता : शॉप नं. ५१८, टेंभी, कोल्हापूर, आगाशी, बाजार पेठ, विरार (प.),ता. वसई, जि. पालघर

संपर्क कार्यालय : महात्मा फुले नगर, चक्रेश्वर अपार्टमेंट समोर, सोपारा रोड, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, Email - prashantdhonde14@gmail.com